





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. २५.०६.२०२४ | अंक नं. ०९८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020








गंज बाजार येथील भाजी मार्केटची झालेली दुरावस्था, तुंबलेली गटार, आणि घाणीचे साम्राज्य. (छाया – धनेश कटारिया)

## भाजी मार्केटमध्ये पसरले घाणीचे साम्राज्य

### तुंबलेली गटार, साचलेले पाणी, दुर्गंधी, पडलेले ओटे, मोकाट जनावरे, उंदीर, घुशीचा मुक्त संचार

नगर– शहराच्या मध्यवर्ती भागातील मुख्य बाजारपेठ असलेल्या गंज बाजारातील महात्मा फुले भाजी मार्केटची सध्या मोठी दुरावस्था झाली आहे. सर्वत्र पसरलेली अस्वच्छता, दुर्गंधी, घाणीचे साम्राज्य, डासांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे साथीच्या आजारांचा फैलाव होऊन बाजारपेठेतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिका प्रशासन अथवा लोकप्रतिनिधींचे या भाजी मार्केटकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने भाजी विक्रेते व्यवसायिक आणि नागरिक नरकयातना भोगत आहेत. गंज बाजार भाजी मार्केटला सध्या मोठी अवकळा आली असून, मार्केटमधील सर्व बाजार



ओट्यांची मोठी पडझड झाली आहे. या ओट्यांच्या खाली उंदीर, घुशींनी मोठ-मोठी बिळे केली आहेत. मार्केटमधील एका बाजूने असलेली गटार नेहमीच तुंबलेली असते. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरलेली आहे. बाजार ओट्यांमधील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गटारीचे पाणी साचून राहिले असून दुर्गंधी आणि डासांचा मोठ्या प्रमाणात फैलाव झालेला आहे. पडलेल्या ओट्यांची, दगड, माती तसेच गटारीतील घाणीचे ठिकठिकाणी ढिगारे पडले आहेत.

हे भाजी मार्केट म्हणजे मोकाट जनावरांसाठी नंदनवनच झाले आहे. जनावरांचा *(पुढील मजकूर पान २ वर)*

## नगर येथील वाडियापार्क क्रीडा संकुलासाठी शासनाकडून ५१ कोटी रुपयांचा निधी मंजूर

### पहिल्या टप्प्यातील साडेपंधरा कोटींच्या निधीला मान्यता : आमदार संग्राम जगताप यांची माहिती



नगर – नगर शहरातील वाडियापार्क जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी खेळाची मैदाने तयार करणे, दुरुस्ती करणे, इनडोअर गेमच्या हॉलची दुरुस्ती करण्यासाठी राज्य सरकारने ५१ कोटी १७ लाख २५ हजार रुपयांच्या खर्चाला मान्यता दिली आहे. पहिल्या टप्प्यातील १५ कोटी ६९ लाख ५२ हजार रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यात ३५ कोटी ४७ लाख ७३ हजार रुपयांच्या निधी मिळणार मिळणार आहे. या निधीमुळे जिल्हा क्रीडा संकुलाचे रुपडे पालटणार आहे.

याबाबत आमदार संग्राम जगताप यांनी राज्य सरकारकडे वारंवार पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेऊन क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य या विभागाचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी या संदर्भात परिपत्रक काढले आहे. नगरमध्ये भव्य जिल्हा क्रीडा संकुल उभरण्यात आले आहे. परंतु तेथे पुरेशा सुविधा नाहीत. क्रीडाप्रेमी व विविध संघटनांनी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे सुविधा देण्यासाठी मागणी केली होती. त्याची दखल घेत आमदार संग्राम जगताप यांनी राज्य सरकारकडे वारंवार पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, जिल्हा क्रीडा संकुलासाठी ५१ कोटींच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात १५ कोटी ६९ लाख ५२ हजार रुपये निधी मिळणार आहे. त्यामध्ये ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक, क्रिकेट ग्राउंड लॉन, स्टेडियम करिता स्प्रिंकलर सिस्टीम करणे, कबड्डी, खो खो, बास्केट बॉल, व्हॉलिबॉल मैदानांचे डोम रूफ, ग्राउंड व इतर बाबींचा समावेश आहे.

दुसऱ्या टप्प्यामध्ये ३५ कोटी ४७ लाख ७३ हजार रुपये मिळणार आहेत. त्यामध्ये स्टेडियमधील प्रेक्षक गॅलरीस रुफिंग करणे, स्वच्छतागृह दुरुस्ती, रेनवॉटर, बॅडमिंटन हॉल, अद्ययावतीकरण, वुडन फलोरिंग करणे, स्वच्छतागृह, सोना व स्टीम बाथ व्यवस्था, ऑकिस्टिक व्यवस्था, वसतिगृह (दुसरा मजला बांधकाम, पेव्हर ब्लॉक संपूर्ण इमारत, रुममधील अंतर्गत कामे, जलतरण तलाव अद्ययावतीकरण, फिल्ट्रेशन प्लांट दुरुस्ती, वेट जीम ट्रेनिंग हॉल, स्वच्छतागृह, अंतर्गत व बाह्य रंगरंगोटी, पेक्षक गॅलरी रुफिंग, पार्किंग एरियामध्ये पेव्हर ब्लॉक, टू व फोर व्हिलर पार्किंग शेड करणे, स्वागत कक्ष अंतर्गत कामे, कुस्ती व बॉक्सिंग हॉल बांधकाम, कुस्ती तालीम अद्ययावतीकरण व नवनिर्मिती, दुमजली बांधकाम तळमजला कुस्ती हौद, पहिला मजला कुस्ती मॅट हॉल, दुसरा मजला बॉक्सिंग हॉल, कबड्डी व खोखो मैदानांचे अद्ययावतीकरण, डोम रूफ व स्वच्छतागृह बांधकाम, दोन सिंथेटिक टेनिस कोर्ट तयार करणे, सीसी रोड, एन वॉटर गटार व्यवस्था, विद्युतीकरण अंतर्गत व बाह्य, ड्रेनेजलाइन व्यवस्था, पाणीलाइन व्यवसथा, रुफ टॉप सोलन पॅनल व्यवस्था, स्टेडियम, बॅडमिंटन हॉल, वसतिगृह, जलतरण तलाव, कुस्ती हॉल आदींचा समावेश आहे. राज्य सरकारकडे आमदार जगताप यांनी केलेल्या मागणीला मोठे यश आले असून निधी मिळाल्यानंतर जिल्हा क्रीडा संकुलाचे रुपडे पालटणार आहे.



नालबंद खुंट येथे ड्रेनेज चोक-अप काढण्यासाठी खोदलेला खड्डा. (छाया – बबलू शेख)

## नगर शहरातील काही भागात नळामधून येतेयं 'गढूळ पाणी'

### वारंवारच्या खोदाईमुळे ड्रेनेज लाईनसह रस्त्यांचीही दूरवस्था

नगर – ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्यासाठी सध्या शहरात ठिकठिकाणी खोदाईचे काम केले जात आहे. तथापि हे खोदलेले खड्डे अनेक दिवस बुजविले जात नसल्याने या ड्रेनेजमधील मैलामिश्रीत घाण पाणी नळांना येत असून या दुषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सध्या पावसाळा सुरू असून ड्रेनेज लाईन चोकअप होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे महापालिकेच्यावतीने चोकअप काढण्यासाठी ड्रेनेज लाईन खोदली जाते. परंतु चोकअप काढल्यानंतर लगेचच सदर खड्डा बुजविला जात नाही. शहरातील नालबंद खुंट येथे मागील १५ दिवसांपासून ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूने खड्डा खोदण्यात आला आहे. मात्र सदरचे काम अद्यापही पूर्ण झाले नसल्याने परिसरातील नळांना मैलामिश्रीत घाण पाण्याचा पुरवठा होत आहे. नालबंद खुंट, बाबा बंगाली, हातमपुरा, खिस्तगल्ली या परिसरात गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दूषित पाण्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे.

ड्रेनेज लाईन चोकअपसाठी खोदलेले खड्डे रहदारीलाही अडथळे ठरत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे. त्याचबरोबर खड्ड्यांमुळे अपघाताच्या घटनाही घडू शकतात. चोकअप झालेल्या ड्रेनेजमुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. नव्याने केलेले रस्ते ड्रेनेज चोकअपमुळे वारंवार खोदून त्यांची दुरावस्था केली जात आहे. महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नळावाटे येणारे ड्रेनेजचे घाण पाणी बंद करावे तसेच ड्रेनेज लाईनचे खोदलेले खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी होत आहे.

## मुंबई शेअर बाजारात तेजी

मुंबई – भारतीय शेअर बाजारात मंगळवारी (दि.२५) पुन्हा तेजी दिसून आली. सेन्सेक्स २०० हून अधिक अंकांच्या वाढीसह ७७,५०० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. त्याच वेळी, निफ्टी देखील ५० पेक्षा जास्त अंकांनी वर आहे. २३,६०० च्या पातळीवर व्यवहार होत आहे.

सेन्सेक्समधील ३० समभागांपैकी २१ समभागांमध्ये वाढ तर ९ समभागांमध्ये घट दिसून आली. आज बँकिंग आणि ऑटो शेअर्समध्ये वाढ झाली आहे. त्याच वेळी, आज आयटी आणि ऊर्जा समभागांवर दबाव दिसून येत आहे.

सोमवारी (दि.२४)परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (एफआयआय) ८२०.४७ कोटी रुपयांचे समभाग विकले. या कालावधीत देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (डीआयआय) ६५३.९७ कोटी किमतीचे शेअर्स विकले.




**स्वतंत्र बंगला विकणे आहे**

उत्तम कंडीशन, पुर्णवेळ पाणी, शहरालगत
1000 स्के. फुट प्लॉट व 1000 स्के.फुट कन्स्ट्रक्शन्स असलेला 1 बीएचके बंगला विकणे आहे.
किंमत ३२ लाख (निगोशिएबल)
वाघमळा, मॅजिस्ट्रिक टॉवर समोर, महापौर वाकळे बंगला परिसर, सावेडी, अ.नगर
मो. 9960868888












जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## आयुष्यात गुरू असणे अत्यंत गरजेचे...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

सचिन पेक्षा त्याचे गुरु, प्रशिक्षक रमाकांत आचरेकर चांगले क्रिकेटर नव्हते पण त्यांनी सचिन घडवला. ओ. एम. नंबियारची पी. टी. उषाशी काहीच बरोबरी नव्हती. पण भारताला महान ॲथलिटस्पैकी एक दिली ती त्यांनी.

आपल्याला आपल्या बाहेरचं कोणीतरी मार्गदर्शन करण्यासाठी हवं असतं. गुरू हा जणू आपलाच आरसा असतो. ज्यात आपल्याला आपलं प्रतिबिंब दिसतं. तो आपल्याला आपली शक्तिस्थानं दाखवतो. ज्यांच्या जोरावर आपल्या कमजोरींशी लढू शकतो. आपली कौशल्यं अधिक परजण्यासाठी गुरुंची आवश्यकता असते. ज्ञानाचा विस्तार करण्यास गुरू पाहिजे.

तुमच्या नर्सरीतल्या, माध्यमिक शाळेतल्या शिक्षिकेनं आयुष्यात तुमच्याएवढी मजल मारली नसेल पण तुमचं जीवन त्यांनी दिलेल्या ज्ञानाच्या (?) पायावरच उभे आहे. आपण आपली तुलना आपल्या मार्गदर्शक प्रकाशाशी करू नये.



तुम्ही किरणांतून सूर्य वजा करा, काहीच शिल्लक राहणार नाही. मडक्यातून माती वजा करा काहीच शिल्लक नसेल. तसेच आपल्यामधून गुरुंची शिकवण वजा केली तर काहीच शिल्लक राहणार नाही. तात्पर्य आयुष्यात गुरू असणे आवश्यक आहे. गुरु विन नाही दुजा आधार...

# नगरच्या हद्दीतून गांजाची तस्करी होत असताना 'गृह', 'एक्साईज' विभाग झोपा काढत आहे काय?

### कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा अन्यथा आंदोलनाचा इशारा

नगर – पुण्याच्या एफसी रोडवरील एका हॉटेलमध्ये तरुणाई ड्रग्सचे सेवन करतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. नगर शहर व लगतच्या तालुका परिसरातील हायवे लगत असणाऱ्या महाविद्यालय परिसरात रात्री उशिरापर्यंत परमिट रूम, बिअर शॉपी सुरू असतात. या ठिकाणी महाविद्यालयीन युवक, युवतींना मद्य सेवनाचे परवाने नसताना देखील सर्रासपणे मद्य विक्री केली जाते. या ठिकाणी केवळ मद्यच विक्री होते की ड्रग्स देखील उपलब्ध करून दिले जातात? हुक्का पार्लर देखील या ठिकाणी चालविले जातात अशी चर्चा आहे. पुणे ड्रग्स प्रकरणाची पुनरावृत्ती नगरमध्ये होऊ नये यासाठी काय प्रतिबंधात्मक कारवाई पोलीस, एक्साईज विभाग करत आहे? नगरच्या हद्दीतून गांजा तस्करी होत आहे, सरकार झोपा काढत आहे काय? देवेंद्र फडणवीस यांचा गृह विभाग, शंभूराजे देसाई यांचा एक्साईज विभाग काय दिवे लावत आहे? असा सवाल लेखी निवेदनाद्वारे शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी केला आहे.

गृहमंत्री फडणवीस, राज्य उत्पादन शुल्क मंत्री देसाई, जिल्हा पोलीस अधीक्षक व राज्य उत्पादन शुल्क (एक्साईज) विभागाच्या जिल्हा अधीक्षकांना याबाबत लेखी निवेदन पाठवून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा काँग्रेसने दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, नगर शहर व लगत असणाऱ्या महाविद्यालयांच्या परिसरातील तरुणाई नशेच्या विळख्यात सापडली आहे. शहरातील कॉलेज, तसेच त्या जवळ अन्य दोन–तीन महाविद्यालय आहेत. तसेच विळद घाटात देखील मोठे शैक्षणिक संकुल आहे. शहराच्या अन्य परिसरातील महाविद्यालयां लगत असणाऱ्या भागात देखील हीच परिस्थिती आहे. महाविद्यालयांलगत असणाऱ्या विविध ठिकाणी अवैधरित्या दारू, बियर विकली जाते.

परवानाधारक परमिट रूम, बियर बार रात्री नियमाचे उल्लंघन करून उशिरापर्यंत सुरू असतात. या ठिकाणी हुक्का पार्लर चालवले जातात अशी चर्चा आहे. ड्राय डेच्या दिवशी सुद्धा राजरोसपणे विक्री सुरू असते. परवानगी देण्यात आलेल्या आस्थापना नियमात चालविल्या जात नाहीत. विशेष म्हणजे महाविद्यालयीन तरुण पिढी ग्राहक म्हणून नशेच्या विळख्यात अडकल्याचे दिसून येते. या हॉटेल्सवर रात्री अपरात्री मारामाऱ्यांच्या घटना देखील होत आहेत. तशा फिर्यादी देखील पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल्या आहेत. याबाबत पोलीस आणि एक्साईज विभागाची संयुक्त कारवाई का केली जात नाही, असा सवाल काळे यांनी केला आहे.

### पुणे पोर्शे ड्रंक अँड ड्राईव्ह केस घडली तर?

तरुण पिढी व्यसनाच्या आहारी गेली आहे. त्यांना नशेची साधनं सहजरित्या उपलब्ध होत आहेत. नुकताच नगर जिल्ह्याच्या हद्दीत दीडशे किलो गांजा मुंबई पोलीस विभागाने रेड करून पकडला. नगर जिल्हा आणि शहराच्या हद्दीतून ही तस्करी सुरू आहे. यातील काही गांजा, ड्रग्स नगर शहरात देखील वितरित होत आहे काय? याचा तपास पोलीस आणि एक्साईज करणार आहे की नाही? असा सवाल काँग्रेसने केला आहे. काळे म्हणाले, महाविद्यालय परिसरात मुले परिसरात असणाऱ्या परमिट रूमवर रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याने नशा करत धिंगाणा घालतात. मारामाऱ्या करतात. यातील अनेक घटनांची पोलीस स्टेशनला सुद्धा तक्रार होत नाही. मात्र दारूच्या नशेत पुण्यातील पॉर्शे ड्रंक अँड ड्राईव्ह केस प्रमाणे काही दुर्घटना घडली तर याला पोलीस आणि एक्साईज विभाग जबाबदार राहील, असा इशारा दिला आहे. प्रशासनाने कोणालाही अभय देऊ नये असे काँग्रेसने म्हटले आहे.

### कॅफेच्या नावाखाली अश्लील चाळे

अहमदनगर शहरात कॅफेच्या नावाखाली अश्लील चाळे करण्यासाठी वेगवेगळे कंपार्टमेंट उपलब्ध करून तिथे शालेय विद्यार्थ्यांसह कॉलेज विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सोय करण्यात येते. यामुळे तरुण पिढी नको त्या गोष्टींना बळी पडत आहे. यामुळे पालक देखील चिंतित आहेत. अशा अवैद्य कॅफेंवर पोलिसांनी कडक कारवाई कारवाई करण्याची काँग्रेसने मागणी केली आहे.

### अन्यथा एक्ससाइज विरोधात आंदोलन

या प्रकारांवर राज्य उत्पादन शुल्क (एक्साईज) विभागाने याबाबत कठोर पावले उचलून योग्य ती कारवाई केली नाही तर शहर काँग्रेसच्यावतीने शहरातील तरुण पिढीला वाचविण्याकरिता किरण काळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ब्लॉक अध्यक्ष मनोज गुंदेचा यांनी दिला आहे.

## टारगेट करून अल्पसंख्यांक समाजावर दहशत

### शांतता कमिटीचे पुनर्गठन करा : पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – अहमदनगर जिल्हा व शहरात जातीयवादी संघटना व समाज कंटकांकडून अल्पसंख्याक समाजाला टार्गेट करण्याच्या उद्देशाने मशीद, दर्ग्यावर दगडफेक व निष्पाप अल्पसंख्यांक युवकांवर प्राण घातक हल्ला केला जात आहे. अल्पसंख्यांक समाजात दहशत पसरविण्यासाठी सुरू असलेल्या या कृत्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असुन असे अनुचित प्रकार पुन्हा घडू नये यासाठी शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रवादी पार्टीच्या अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा अध्यक्ष अथर खान, उपाध्यक्ष समीर पठाण, सचिव दिलावर पठाण, उपाध्यक्ष अल्ताफ शेख, प्रदेश सचिव फारूक रंगरेज, मोहसीन पठाण, तोफिक पटेल, हमीद सय्यद, अमीर शेख, पापामिया पटेल, तौफिक शेख आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक दिवसापासून अहमदनगर जिल्ह्यात व शहरात अल्पसंख्याक समाजावर विविध प्रकारे अत्याचार सुरू आहे व धार्मिक स्थळांना टार्गेट केले जात असून असे कृत्य करणाऱ्या समाज कंटकांवर कठोर कारवाई करावी शहरात विविध जाती धर्माचे समाज बांधव आनंदाने गुण गोविंदाने राहत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील व शहरातील शांतता अबाधित राहण्यासाठी जातीय तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी व अहमदनगर जिल्ह्यातील शांतता कमिटीचे पुनर्गठण करावे कारण या कमिटीतील बहुतांश लोकांचे निधन झालेले आहे.



शांतता कमिटीचे पुनर्गठन करा या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

## नगर रेल्वे स्टेशन वरून पळवून नेलेल्या बाळाचा लोहमार्ग पोलिसांनी लावला शोध

### अपहरणकर्ती महिला व दोन पुरुषांना सुपा येथे पकडले

नगर – नगरच्या रेल्वे स्टेशन वरून पळवून नेलेल्या ११ महिन्यांच्या बाळाचा शोध घेण्यात लोहमार्ग पोलिसांना यश आले असून पोलिसांनी सुपा (ता.पारनेर) येथे एक महिला व २ पुरुष अशा तिघा आरोपींना पकडून बाळाची त्यांच्या तावडीतून सुखरूप सुटका केली आहे.

दि. १६ जून रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास अहमदनगर रेल्वे स्टेशन मेनगेट परिसरातील एटीएम कॅबीनच्या समोरील लिंबाच्या झाडाखालून फिर्यादी अमृता आकाश खडसे (वय २३, रा. मु. पो. तोंडगाव ता. जि. वाशिम) हिच्या जवळ एक अनोळखी महीला (वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे) आली तिने फिर्यादी यांचे जवळ येवून तीचेशी ओळख वाढवून त्यांचेजवळील ११ महीन्याचे त्यांचे बाळ स्वानंद आकाश खडसे यांस स्टेशन बाहेरून जेवणाकरीता वरण भात घेवून येते अशी बतावणी करून बाळास पळवून नेले होते. सदर अनोळखी महीला बाळास घेवून परत आलीच नाही म्हणुन बाळाचे आईने अहमदनगर लोहमार्ग पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्याने त्या अनोळखी महिले विरोधात भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक संजय लोणकर हे करीत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा केलेले आरोपी हे सुपा परिसरात आहेत. ही माहीती मिळाल्याने शिताफीने त्यांना ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केल्याने आरोपी अनिल अशोक जाधव (वय ४१, रा. अमित मोटर्स पाठीमागे, सुपा, ता. पारनेर), नवनाथ विष्णु धोत्रे (वय ३३, रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर), सौ. शालन अनिल जाधव (वय ३८, रा. अमित मोटर्स पाठीमागे, सुपा, ता. पारनेर) यांना अटक करण्यात आली असून अपहरण केलेले बालक स्वानंद आकाश खडसे याची त्यांचे तावडीतून सुटका करण्यात आली आहे.

सदरची कारवाई लोहमार्ग पोलिस पुणे विभागाचे पोलीस अधीक्षक तुषार दोषी व उप विभागीय पोलीस अधिकारी महेश देवीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक संजय लोणकर, पोलीस अंमलदार सर्फराज खान, बाबासाहेब गवळी, ईरफान शेख, रविंद्र देशमुख, अविनाश खरपास, आसाराम येवले, किरण तोरडमल, प्रकाश गडाख, गोरक्ष नवले, वनिता समींदर, मंगल आहेर, होमगार्ड साबिर शेख व मंदार सटाणकर यांनी केली असून पुढील तपास पोलीस उप निरीक्षक संजय लोणकर हे करीत आहेत.

# निलेश लंके यांनी संसदेत घेतली चक्क इंग्रजीतून खासदारकीची शपथ

### 'रामकृष्ण हरी' म्हणत जपली महाराष्ट्राची अस्मिता; डॉ.सुजय विखे यांच्या प्रचार काळातील आव्हानाला दिले प्रत्युत्तर

नगर – नगर दक्षिण लोकसभा मतदार संघाचे नवनिर्वाचीत खासदार निलेश लंके यांनी संसदेत इंग्रजीतून खासदार पदाची शपथ घेत निवडणूक प्रचार काळात प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. तर शेवटी जय हिंद जय महाराष्ट्र, रामकृष्ण हरी म्हणत महाराष्ट्राची अस्मिता ही जपली आहे.

निवडणुकीच्या प्रचाराच्या पहिल्याच टप्प्यात डॉ. सुजय विखे यांनी जाहीर भाषणात लंके यांची टिंगल केली होती. समोरच्या उमेदवाराने आपल्या सारखे इंग्रजी व हिंदी बोलता नाही आले तरी वाचून दाखवावे अशा शब्दात हिणवले होते. लंके यांनी विखे यांचा निवडणुकीत पराभव केल्यावर मंगळवारी (दि.२५) संसदेत त्यांचा खासदार पदाचा शपथविधी पार पडला. यावेळी त्यांनी इंग्रजी भाषेत खासदार पदाची शपथ घेत विखे यांनी केलेल्या टीकेला जोरदार चपराक दिली. शेवटी रामकृष्ण हरी म्हणत महाराष्ट्राची अस्मिताही जपली.



खा. निलेश लंके यांनी संसदेत शपथ घेतल्यानंतर नगर मधील संपर्क कार्यालयासमोर जल्लोष करताना माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, अमोल कांबळे, प्रवीण वारुळे, गणेश रोडे, सचिन कराळे, सागर जपकर, शिवाजी कराळे, संचित निकम, रवी धनवटे, सौरभ सुंबे, सुरेश कसाब, अक्षय शिंदे, गणेश तोडमल यांच्यासह निलेश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते.

खा. लंके यांचा शपथ विधी पाहण्यासाठी लंके समर्थकांनी नगर शहरातील बुरुडगाव रोड येथील खासदार निलेश लंके यांच्या कार्यालयासमोर स्क्रीन लावून शपथविधी लाईव्ह बघितला. तसेच शपथविधी झाल्यानंतर फटाक्याची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंदात जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, अमोल कांबळे, प्रवीण वारुळे, गणेश रोडे, सचिन कराळे, सागर जपकर, शिवाजी कराळे, संचित निकम, रवी धनवटे, सौरभ सुंबे, सुरेश कसाब, अक्षय शिंदे, गणेश तोडमल यांच्या सह निलेश लंके प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

पारनेर येथे ही खा.निलेश लंके यांच्या जनसंपर्क कार्यालयाबाहेर दीपक लंके, पारनेर नगर पंचायतचे नगरसेवक व सहकारी मित्रांनी फटाके फोडून जल्लोष केला. या शिवाय नगर दक्षिण मतदार संघात ठिकठिकाणी लंके समर्थकांनी फटाक्यांच्या आतिषबाजीत जल्लोष केला.

### 'अर्बन' प्रकरणी डॉ. निलेश शेळकेला अटक

नगर – नगर अर्बन बँकेच्या २९१ कोटींच्या कर्ज फसवणूक प्रकरणात डॉ. निलेश शेळके याला अटक करण्यात आली. कर्ज प्रकरणातील गैरव्यवहार, तसेच बँकेच्या शाखांतर्गत व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या एचओबीआयटी खात्यातून डॉ. शेळके याच्या खात्यात रकमा वर्ग झाल्याचे फोरेन्सिक ऑडिटमध्ये समोर आले आहे. त्यामुळे त्याला पुन्हा अटक करण्यात आली आहे.

शहर सहकारी बँक व नगर अर्बन बँकेतील कोट्यवधी रुपयांच्या कर्ज गैरव्यवहार प्रकरणी यापूर्वी डॉ. शेळके अटकेत होता. आर्थिक गुन्हे शाखेमार्फतच याचा तपास सुरू होता. त्यात शेळके याला जामीन मंजूर झालेला आहे. सोमवारी (दि.२४) डॉ. शेळके न्यायालयात हजर होता. तेथून बाहेर पडल्यावर आर्थिक गुन्हे शाखेने त्याला दुसऱ्या गुन्ह्यात अटक केली असल्याचे तपास अधिकारी उपअधीक्षक अमोल भारती यांनी सांगितले.

### भारत बारटक्के यांचे हृदयविकाराने निधन



नगर – विनायकनगर येथील रहिवासी भारत विश्वनाथ बारटक्के (वय ८२) यांचे १९ जून रोजी सायंकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर अमरधाम स्मशानभूमी, अ.नगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. भारत बारटक्के हे शिंपी समाजाचे सहसचिव गोविंद बारटक्के यांचे भाऊ होत. तसेच भारतीय जनता पार्टी वकील आघाडीचे अध्यक्ष चंदन बारटक्के यांचे चुलते तसेच श्रीकृष्ण बारटक्के, अनंत बारटक्के यांचे वडील होत.त्यांच्या पत्नी, २ मुले, १ मुलगी, जावई, १ भाऊ, २ बहिणी, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## 'नगर अर्बन'च्या आरोपींवर कारवाई करा अन्यथा उच्च न्यायालयात 'दाद' मागणार

### आरोपींना अटक करण्यास विलंब का? जागृत सभासद राजेंद्र चोपडा यांचे पोलिस अधीक्षकांना पत्र



नगर – नगर अर्बन मल्टीस्टेट को ऑप.बँक घोटाळ्याप्रकरणी फॉरेन्सिक ऑडिटमध्ये १०५ आरोपी निष्पन्न झाले असताना आतापर्यंत १५ च्या आसपास आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. एकही मोठ्या संचालक किंवा कर्जदारास अटक झालेली नाही. कोट्यवधी रुपयांचे कर्ज घेवून बँकेची फसवणूक करणारे अनेक कर्जदार राजरोसपणे शहरात फिरत आहेत. परंतु, त्यांना अटक केली जात नाही. रेकार्डला आरोपी म्हणून नोंद असताना पोलिस कारवाई का करीत नाहीत, असा प्रश्न जनसामान्यांना पडला असून पोलिसांनी गोरगरीब ठेवीदारांचे पैसे परत मिळण्यासाठी आपले अधिकार प्रभावीपणे वापरुन आरोपींना अटक करावी, अशी मागणी बँकेचे जागृत सभासद राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.

राजेंद्र चोपडा यांनी पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, नगर अर्बन बँकेची थकबाकी ८२० कोटी रुपयांची असून ३०० कोटींचा घोटाळा झालेला आहे. अनेक गोरगरीब ठेवीदारांचे पैसे बँकेत अडकले आहेत. बँकेच्या लुटणाऱ्या अनेकांची नावे फॉरेन्सिक ऑडिटमध्ये निष्पन्न झाली आहेत. पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केल्यास कायद्याच्या भीतीने अनेक जण बँकेचे पैसे भरतील. परंतु पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने सगळे आरोपी निर्धास्त आहेत. त्यांना अटक होत नाही तसेच त्यांच्या मालमत्ताही जप्त होत नाहीत. बँकेतील काही संचालक व काही अधिकारी यांनी संगनमताने हा गंभीर आर्थिक गुन्हा केलेला आहे.

एखाद्या हायप्रोफाईल गुन्ह्यात किंवा पुण्यातील पोर्शे कार अपघातासारख्या गुन्ह्यात मुख्यमंत्री, गृहमंत्री स्वत: वैयक्तिक लक्ष घालून कारवाईबाबत पोलिसांना सूचना देतात. दुर्दैवाने नगर शहरात इतका मोठा आर्थिक घोटाळा होवून सुध्दा गृहमंत्री गांभीर्याने लक्ष देण्यास तयार नाहीत. या प्रकरणात तातडीने गांभीर्याने लक्ष घालून आरोपींवर कायदेशीर कारवाई करावी अन्यथा हायकोर्टात दाद मागण्याचा इशारा राजेंद्र चोपडा यांनी दिला आहे.

## भाजी मार्केटमध्ये पसरले घाणीचे साम्राज्य

(पान १ वरुन)

मुक्त संचार असल्याने मार्केटमधील रस्ते शेण, मलमूत्राने माखलेले आहेत. त्यामुळे मार्केटमध्ये पायी चालणेही कठीण झाले आहे. येथे असणाऱ्या स्वच्छतागृहाची अवस्था तर अत्यंत बिकट आहे. सडलेला भाजीपाला, साचलेले पाणी, तुंबलेली गटार यामुळे सध्या सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. वर्षानुवर्षे हीच परिस्थिती कायम राहत असल्याने या भाजी मार्केटला कोणी वाली आहे की नाही ? असा सवाल उपस्थित होत आहे. गंज बाजार भाजी मार्केटमध्ये ग्राहकांची मोठी वर्दळ असते. विशेष म्हणजे शहराबरोबरच ग्रामीण भागातून बाजारपेठेत येणारे ग्राहक या भाजी मार्केटमध्ये खरेदीदार आहे. मात्र भाजी मार्केटची मोठी दुरावस्था झाल्याने येथील भाजी, फळे विक्रेते ही मार्केटच्या बाहेर आपली दुकाने थाटत आहेत. विक्रेते व्यावसायिकांबरोबरच ग्राहकांना येथे कोणतीच सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच विक्रेते मार्केटमध्ये आपली दुकाने लावत आहेत. गंज बाजारला लागून सोनार बाजार, कापड बाजार आहे. एकाच वेळी सर्व खरेदी होत असल्याने नागरिक या बाजारात मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी येत असतात. त्यात त्यांना अशा अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने शहरात येऊ की नये? असा सवाल त्यांच्या मनात उपस्थित होतो. शहरातील मुख्य भागातील या गंभीर बाबीकडे नगरसेवक, आमदार, खासदार, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पालकमंत्री हे लक्ष देणार का? हा प्रश्नच आहे.

या मार्केटच्या दुरावस्थेमुळे भाजी विक्रेते, फळ विक्रेते व इतर दुकानदार मार्केटच्या रस्त्यावर अतिक्रमण करत आपल्या व्यवसायाच्या गाड्या लावत असल्याने या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. बाजारात येणाऱ्या नागरिकांना महिलांना आपले वाहन लावण्यासाठी जागाच मिळत नाही जर थोडीशी जागा कुठे मिळाली तर हे अतिक्रमण धारक त्यांना इथे गाडी लावू नका किंवा गाडी लावून देत नाही यावरून अनेक वेळा वाद विवाद होतात या अतिक्रमणाच्या गंभीर बाबीकडे महापालिका लक्ष देऊन कारवाई करणार का? गुदमरलेल्या रस्त्याचा श्वास मोकळा करणार का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### गुळ खाण्याचे बहुविध फायदे

गुळाचे सेवन केल्याने संसर्गजन्य आजारांपासून मुक्ती मिळते. गुळाचा चहा प्यायल्याने घसा तसेच फुप्फुसामध्ये झालेला संसर्ग दूर होतो.

थकवा कमी होण्यास मदत - गुळामध्ये साखरेपेक्षा जास्त जीवनसत्व व पोषक घटक असतात. त्यामुळे थकवा दूर होतो. गुळाचा चहा प्यायल्याने एनर्जी वाढते. अशा प्रकारे गुळाचा चहा प्यायल्याने वरील फायदे मिळतात. भविष्यात मधुमेहाच्या आजारापासून सुटका करायची असेल, तर आतापासून गुळाच्या चहाचे सेवन करणं फायदेशीर ठरतं. तुम्हीही साखरेचा चहा पीत असाल, तर वेळीच सावध व्हा!

## पाककला

### तिळाची बर्फी

**साहित्य** - २०० ग्रॅम तीळ, २०० ग्रॅम काजूचे तुकडे, ४०० ग्रॅम साखर, १ १/२ वाटी सायीसह दूध, १/२ चमचा रोझ इसेन्स, वर्खाचा कागद

**कृती** - सर्वप्रथम तीळ साफ करून घेणे त्यानंतर चुलीवर मंद आंचेवर भाजावेत थोडे कमीच भजावे अगदी लालसर होता कामा नये नंतर मिक्सरला लावून त्यांची पूड करावी सोबत काजुचीही पूड करावी. एका पातेल्यात साखरेत सायीसकट दूध घालून पाक तयार करून घेणे. पाक तयार झाल्यानंतर त्यात इसेन्स, काजूची व तिळाची पूड घालून ढवळावे मिश्रण एकजीव करून घेऊन लगेच तूप लावलेल्या पातेल्यात ओतून घेणे गरम मिश्रण असतानाच त्यावर वर्खाचा कागद थापावा लगेच बर्फी करण्यास सुरवात करावी बर्फी झाल्यावर सर्व्ह करून ५-१० मिनिटांनी थंड झाल्यानंतर त्याचे सेवन करावे.

## वास्तू

### देवघरासंबंधी

* देवघर कधीही अस्वच्छ, धुळीने माखलेले राहू देऊ नये.
* पूर्व-आग्नेय किंवा दक्षिण-आग्नेय दिशेच्या जिन्यामुळे किरकोळ अपघात होतात, दुखापत होते, कलह, भांडणे होतात, आजारपण वाढते.
* देवघर बाथरुम किंवा शौचालयाच्या बरोबर समोर नसावे.

## सौंदर्य

* आपण फळे खात असाल, तर ती कुस्करून चेहऱ्यावर लावा. त्वचा उजळेल.
* आपण आपल्या घरीही फेसपॅक बनवू शकतो. अगदी आपल्या दररोजच्यावारातील वस्तुंपासूनही तो तयार हातो. त्यासाठी मसूर डाळ, मुलतानी माती, चंदन पावडर, चिमूटभर जायफळ एकत्र वाटून ते गुलाब पाण्यात मिसळा व चेहऱ्यावर लावा. वाळल्यानंतर धुवून टाका. हे फेस स्क्रबचे काम करील. चेहरा स्वच्छ करण्याचा उत्तम उपाय आहे.

## सल्ला

* ब्रेडच्या कडा वेगळ्या काढून त्याचे चौकोने तुकडे करून तळावेत. टोमॅटो सूप केल्यावर त्यात घालता येतात.
* आदल्या दिवशीचे साधे वरण असल्यास त्यात थोडीथोडी सर्व पिठे घालावीत. ओवा, जिरे, हिंग, हळद, लसूण, मिरची, कांदा बारीक चिरून घालावा. थालिपीठ लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

**बुधवार, दि. २६ जून २०२४**

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, धनिष्ठा १३।०५

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

**राशिभविष्य-**

**मेष** : आर्थिक क्षेत्रात संयमाने वागा. घरातील वातावरणामुळे मन प्रसन्न राहील. आहारावर विशेष लक्ष द्या. व्यापार व्यवसायात सावधगिरी बाळगा.

**वृषभ** : भूमि, वाहनामुळे लाभ होईल. आनंद वाटेल. खाण्या-पिण्यावर नियंत्रण ठेवा. घरातील व्यक्तिशी वाद होऊ शकतो.

**मिथुन** : पुष्कळ दिवसांपासून साचलेली कामे पूर्ण होतील. आत्मविश्वासाने काम केल्याने यशाची गुरुकिल्ली सापडेल. घरासाठी मौल्यवान वस्तू खरेदी कराल.

**कर्क** : आवडत्या छंदासाठी वेळ, पैसे खर्च कराल. तुमच्या सार्मथ्यात वाढ. होईल. आनंदाची बातमी कळेल. मानसिक अस्थिरता दूर करण्याचा प्रयत्न करा. कामात पूर्ण समर्पणभाव ठेवा. राजकीय व्यक्तींना काळ अनुकूल आहे.

**सिंह** : आध्यात्मासंबंधी कामांमध्ये विशेष लाभ प्राप्ति योग. कौटुंबिक सुख लाभेल. मिळालेली संधीचे सोने कराल.

**कन्या** : निर्णय घेण्यात दुविधा राहील ज्यामुळे कामाची गति बाधित होईल. कामात निश्चितपणे यश मिळेल.

**तूळ** : आवास संबंधी समस्या सुटतील. सुखद वातावरण राहील. सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नोकरदार व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे.

**वृश्चिक** : व्यापार क्षेत्रात लाभ. आध्यात्मिक चेतना मिळेल. मुलांकडून सुखद बातमी कळेल. अडकलेली कामे आपल्या प्रयत्नांमुळे पूर्ण होतील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**धनु** : आरोग्याकडे लक्ष द्या. वादांपासून लांब रहा. आनंदी वातावरण राहील. सजावटीच्या वस्तु क्रय कराल. इच्छित कार्य थोड्या उशीरा होतील. नोकरदार कामात व्यस्त राहातील.

**मकर** : आळस करू नये, कामे वेळेत करण्याचा प्रयत्न करा. आनंददायी बातमी कळेल. आकस्मिक लाभ. प्रियजनांची भेट. मित्रांपासून, सहकाऱ्यांपासून लाभ मिळेल.


**कुंभ** : आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना मनाची एकाग्रता साधता येईल. आय-व्ययमध्ये संतुलन राहील. अडकलेली कामे पूर्ण होतील. भावनेच्या भरात वाहून नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मीन** : घरात किंवा कुटुंबात शुभप्रसंग घडतील. व्यापार-व्यवसाया अनुकूल वातावरण राहिल. लांबचे प्रवास टाळा. अपेक्षेनुसार कार्ये होतील. आरोग्य उत्तम राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# शब्दगंध क्र. ६९५३

सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ६९५२ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प | रि | सं | वा | द | ■ | चौ | क |
| द | ■ | क | र | म | णू | क | ■ |
| क | मा | ल | ■ | द | ■ | स | ह |
| ■ | व | न | ■ | मा | स | ■ | ज |
| मा | शी | ■ | न | ट | ना | ग | र |
| ल | ■ | सा | ल | ■ | थ | वा | ■ |
| कं | गा | ला | ■ | वा | ■ | क्ष | मा |
| स | र | स | क | ट | ■ | ■ | था |

**आडवे शब्द :-** १) सहन करणारा ; सोशीक ५) अवघड नसलेला; सुगम; ओसरी ७) उत्तराधिकारी; हक्कदार ८) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा ९) ऐट; रुबाब १०) गुच्छ; झुबका ११) सत्त्व; परीक्षा; चाचणी १२) सुविधा १५) बुद्धी १६) अगदी सारखे; तुल्य ११) टोळी; टीम; चमू २१) आकाशातून जाणारे एक वाहन २२) दस्ता; कुटण्याचे साधन

**उभे शब्द :-** १) एक अधिक पाव २) कथेकरी; कीर्तनकार ३) धमनी, शीर, नाडी, रक्तवाहिनी ४) बारीकसारीक छोटा; हलका ५) गुजरातमध्ये असलेले प्रसिद्ध ज्योतिर्लिंग ६) कालवा; नहर ९) वनस्पती: भाजीपाला १०) एक प्रकारचा साप १३) साधू; संन्यासी १४) कृष्णाचा दुष्ट मामा १७) मोठेपणा; थोरवी; महती १८) आई; माय; जननी १९) माग; तपास; शोध; ठावठिकाणा २०) श्रम; मेहनत

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ग्रंथालय हे साहित्य वस्त्रालंकारांचे भांडार आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### ताप का येतो?

शरीराचे तापमान ९८.७० फॅरनहाईट वा ३६ ते ३७.५० सेल्सीयस इतके असते. मानव उष्ण रक्ताचा प्राणी आहे. सभोवतालीचे तापमान- १५० सेल्सीयस (जसे लडाख, श्रीनगरमध्ये असू शकते) ते ४७० सेल्सीयस (जसे राजस्थान, विदर्भात असू शकते) पर्यंत बदलत राहिले, तरी आपले शरीर स्वतःचे तापमान ९८.७० फॅरनहाईट इतकेच ठेवते. हे कसे होते याचा विचार केल्यास लक्षात येते की, मेंदूमध्ये तापमान नियंत्रणाचे केंद्र असते. या केंद्राच्या कार्यामुळेच तापमान नियंत्रणाखाली राहते. दिवसभरात तापमानामध्ये १.५० सेल्सीयस एवढा बदल सामान्यपणे होऊ शकतो. यापेक्षा जास्त बदल झाला तर मात्र आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. शरीरात चयापचयामुळे ऊर्जा निर्माण होते तसेच पर्यावरणातूनही शरीर ऊर्जा मिळवते. शरीरातील ऊर्जा थंड पदार्थापर्यंत संवहित होते, तसेच पर्यावरणाचे तापमान कमी असेल तर पर्यावरणातही संवहित होते. घामाद्वारे शरीर ऊर्जा बाहेर टाकते, कारण अशावेळी घामाच्या बाष्पीभवनात ती वापरली जाऊन शरीर थंड होते. याउलट थंडीच्या काळात शरीर उष्णता साठवून ठेवते.

जंतूच्या संसर्गावर प्रतिकार म्हणूनही शरीर तापाच्या रूपाने प्रतिसाद देते. या वाढलेल्या तापमानामुळे शरीरात शिरलेल्या जंतूंची वाढ थोपवली जाते. जंतूच्या प्रभावामुळे काही रासायनिक पदार्थ बाहेर पडतात, ज्यांच्यामुळे मेंदूतील तापमान नियंत्रण केंद्राचे काम बिघडते व ताप येतो. हिवतापासारख्या रोगात म्हणूनच ताप येतो. अशा तापात येणाऱ्या हुडहुडीमुळे शरीर उष्णता बाहेर टाकायच्या ऐवजी शरीरात अधिक उष्णता निर्माण करते, कारण तापमान नियंत्रण केंद्रात बिघाड निर्माण झालेला असतो.

क्रोसीनसारख्या गोळीने ताप उतरतो; पण नुसता पाय उतरवण्यापेक्षा ज्या कारणाने ताप आला आहे, त्या कारणाचा समूळ नायनाट करणे आवश्यक असते. ताप जास्त असल्यास शरीर गार पाण्याने पुसणे, कपाळावर गार पाण्याच्या, पट्ट्या ठेवणे या उपायांनीही ताप उतरतो.

## सिंहाची घमेंड

अरण्यात सर्व प्राण्यांची धावपळ झाली. प्रत्येकजण लपण्यासाठी घाईने पळत होता. एक पारधी अरण्यात येऊन शिकार करत होता. आतापर्यंत त्याने कित्येक प्राण्यांना ठार मारले होते, म्हणून जो तो प्राणी आपल्या गुहेत लपून बसत होता. प्राण्यांचा भित्रेपणा पाहून वनराज सिंह मोठ्या घमेंडीने आणि गर्वाने म्हणाला,

''अरे प्रजाननांनो, अजून मी मेलो नाही. मी जिवंत असतो तुमच्या केसालाही धक्का लावण्याची कोणाची हिंमत होणार नाही. मी जर तुमचे रक्षण करु शकलो नाही, तर माझा काय उपयोग? म्हणून मित्रांनो, असे भिऊन पळू नका. माझे शौर्य आणि शक्ति तुमच्या चांगल्या परिचयाची आहे. तुम्ही आता शांत बसा. तुमच्या शत्रूचा निःपात करतो की नाही, हे आता तुम्हाला दिसेलच.''

अशा रीतीने मोठ्या आवेशाने आणि गर्वाने सिंह बोलत असता अधून-मधून डरकाळी फोडी आणि जमिनीवर शेपटाचे फटकारे मारी. इतक्यात पारध्याने सोडलेला एक बाण नेमका सिंहाच्या पंज्यात खचकन घुसला. त्या वेदनेने सिंह ओरडू लागला असता जवळच लपून बसलेला कोल्हा त्याच्या जवळ जात म्हणाला,

''महाराज, तुमच्यासारख्या शक्तिवान आणि बलवान प्राण्यालाही केवळ आपल्या एका बाणाने जायबंदी आणि घायाळ करणारा आपला पराक्रमी शत्रू कोण असेल बरे'' तेंव्हा सिंह म्हणाला,

''कोल्होबा, मला शत्रूचा अंदाज आला नाही, ती माझी चूकच. तो समोर हातात धनुष्य घेऊन माणूस नावाचा प्राणी उभा आहे, त्यानेच मला जायबंदी केले. ह्या माणूस नावाच्या प्राण्याला आम्ही कधीही जिंकू शकत नाही.''

**तात्पर्य** : नुसती शक्ती आणि बळ असून कोणी सामर्थ्यवान होऊ शकत नाही. यापेक्षा बुद्धीचे सामर्थ्य अधिक आहे.

## जीवन चक्र



आम्हांला सर्वांना शांतता हवी आहे. कुणालाही अशांती आवडत नाही. चला आपण ही बोधपर कथा वाचू आणि पाहू. की, शांततेच्या मार्गाबाबत आम्ही काय बोध घेतो.

एक दिवस इच्छा आणि संतोष (समाधान) ह्यांच्यात कोण जास्त महान आहे यावरून जोरदार वाद-विवाद झाले. वाद वाढतच गेला. गोष्टीमध्ये नेहमी घडते त्याप्रमाणे वाद मिटविण्याकरीता शेवटी त्यांनी एका हुशार, चतुर व्यक्तीचा सल्ला घेण्याचे ठरविले. जसे जुन्या गोष्टीमध्ये सांगतात की, बहुतेक चतुर व्यक्ती पर्वतावर राहतात, इच्छा आणि संतोष पर्वतावर गेले. चतुर व्यक्तीने त्यांचे भांडण कशाबाबत आहे ते ऐकून घेतले आणि तो त्यांना म्हणाला, तुमच्या पैकी कोण योग्य आहे हे सिद्ध करण्याकरीता मला असे वाटते की तुम्ही आळीपाळीने एका सुखी आणि श्रीमंत मनुष्याबरोबर रहावे. तुम्ही त्यांच्याबरोबर रहाल त्यानंतरच आपण त्यांच्याकडून निर्णय करू की तुमच्या पैकी कोण जास्त महान आहे.''

इच्छा आणि संतोष ह्यांनी विचार केला की भांडण सोडविण्याकरीता हा उत्तम पर्याय आहे. त्या पर्वतावरून ते खाली गावात आले. एका सुखी आणि श्रीमंत व्यक्तीला शोधण्याकरीता, ज्याच्याजवळ त्यांना रहायचे होते. प्रथम इच्छेने त्या व्यक्ती बरोबर रहावे असा त्यांनी निर्णय घेतला. ज्या क्षणी इच्छा त्या व्यक्तीच्या घरी राहू लागली त्या क्षणापासुन त्या सुखी आणि श्रीमंत व्यक्तीला जाणवू लागले की साधरणतः त्याचे मन जे शांत आणि तर्कसंगतीस धरून असे त्या मनात वाईट विचार येऊ लागले. एक दिवस अचानक तो व्यक्ती आपल्या पत्नीला म्हणाला चल, आपल्याला संपुर्ण जगप्रवास करायचा आहे. दूर दूर असणाऱ्या विलोभनीय स्थळांना पहाण्याचा माझा मानस आहे. त्याच्या पत्नीने त्याच्याकडे असे पाहिले जसे तो हे वक्तव्य वेड्यासारखेच करीत आहे. शेवटी अनेकदा विनंती केल्या नंतर त्या व्यक्तीची पत्नी त्याच्या बरोबर जाण्यास तयार झाली. त्या व्यक्तीने बँकेतून आपले सर्व पैसे काढले व प्रवासाकरीता समुद्रमार्गाचे तसेच महागड्या हॉटेल्सचे आरक्षण (बुकींग) केले.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

एक टन गन्ने से ६०० लीटर रस और उससे १५० किलो गुड सामान्यतया बनता है। लेकिन बाबा की इस खेती से पहले वर्ष १७० से १८० किलो गुड बना और सबसे कमाल की बात कि हर साल इसमें बढोतरी होती रही । जनवरी २०१४ में औसत १९० से २०० किलो गुड बना, यह चमत्कारिक अनुभव देखने को मिला । सभी प्रकार के अनाज के बीज संस्कार की विधि अनुसार बुआई करते हैं। गन्ने का खेती के बीच में हम तूअर, मूंग, उड़द, तिल, बाजरा, मूंगफली एवं सोयाबीन यह मिक्स फसल लेते हैं। सन २०१३ में एक एकड़ गन्ने में सिर्फ मात्र मुट्ठी भर तूअर के बीज प्रयोग के तौर पर बीच-बीच में बोये, जिसका परिणाम ऐसे हुआ उस प्लॉट के बाजू में एक छोटा-सा तालाब है जो खास पंछियों और जीव-जन्तुओं को पानी के लिये २००९ में ही बनाया गया। जिसमें १६ लाख लीटर पानी १२ ही मास रहता है। उसके चारों ओर नारियल, नीम, इमली, पीपल, बरगद, अमरूद, सीताफल, रामफल, आंवला, अंजीर के पेड़ लगाये हैं, वहाँ पेड़ पर पंछियों को घर बनाने के लिये और पानी पीने की व्यवस्था हो, ऐसी शुभ भावना थी। और साथ ही हमने देखा कि दूसरे किसान ज्वार के, बाजरे के, चावल के खेत में पंछियों को आने नहीं देते हैं लेकिन हमने २० गुंठा जमीन केवल पंछियों के लिये रखी जिसमें सीजन अनुसार खरीफ में चावल, रबी में ज्वार और बाजरा खाने के लिये रखी। इसके फलस्वरूप पंछियों के लिये पीने के लिये पानी और खाने के लिये अनाज मिलने से जो तूअर है उसके ऊपर जो आनेवाली कीट है उसको किसी भी प्रकार का कीटनाशक स्प्रे नहीं करना पड़ा, और उस मुट्ठी भर तूअर के बीज से १०० किलो ग्राम तूअर (अरहर की दाल) का उत्पादन मिला और वो भी ९० प्रतिशत निरोगी।

सभी प्रकार के धान के लिये समय प्रति समय देशी गाय, बैल से मिलनेवाला गोमूत्र और गोबर से जीवामृत बनाकर इस्तेमाल करते हैं। खेती में बीच-बीच में योग भट्ठी एवं ब्रह्माभोजन के निमित्त सेन्टर के सभी भाई बहनें आते हैं और अपनी शुभ भावना से श्रेष्ठ शुद्ध शक्तिशाली वायब्रेशन का योगदान देते रहते हैं। २०१२ में जो गुड़ बना उसका लैब रिपोर्ट को देख सेन्द्रिय खेती का प्रमाण-पत्र, ऑर्गेनिक इण्डिया कॉउसिंल से रेकोग्नाइज़ महाराष्ट्र ऑर्गेनिक फॉर्मिंग फेड्रेशन से प्राप्त हुआ। एवं २०१३ में अक्कलकोट से आदर्श किसान पुरस्कार भी प्राप्त हुआ है। यौगिक पद्धति की खेती से निकलने वाली सभी फसलों का सेन्द्रिय अन्न के प्रमाणीकरण होने के कारण इसका मार्केट रेट से भाव ज्यादा मिलता है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**गण्या :** काय रे तुझे आणि वहिनीचे भांडण मिटले का???

**मन्या :** हो, गुडघ्यावर रांगत रांगत आली होती माझ्याकडे

**गण्या :** हो का? मग काय म्हणाल्या रे वहिनी...!

**मन्या :** कॉटच्या खाली लपु नका,
या बाहेर...मारणार नाही मी

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

आवाजाच्या रोखाने मी हिंडत आलो आहे
तरीही मी अज्ञात स्थळी पोहोचलो गेलो
बसू दे जेव्हा मी पूर्णत: निवांत असेन



**मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

अपानवायूची विकृती कमी करण्यासाठी सहचर तेल व स्नायुबंधांना बल मिळण्यासाठी चंदनबलालाक्षादी तेल यांचा उत्तरबस्ती मूत्राशयामध्ये २५ ते ३० मिली कॅथेटरदान केला. मूत्रमार्गातील व गर्भाशयाच्या स्नायूंची ताकद वाढल्यामुळे व अपानवायूची विकृती कर्मा झाल्यामुळे हळूहळू तिला लघवीचा वारंवार होणारा त्रास कमी झाला. पाच ते सहा उत्तरबस्तीनाता म्हणजेच साधारणत: दीड महिन्याने तिचा त्रास पूर्णपणे थांबला. तिचे मानसिक ताण कमी होण्यासाठी तिला ध्यानधारणा, योगासने, प्राणायाम करावयास सांगितले. त्याकरिता तिने योगशिक्षिकेकडे योगासनांचा क्लास लावला. यामध्ये तिला सहजोली ही मुद्रा वारंवार करण्यात सांगितली. या सर्व उपचाराला आता एक वर्ष पूर्ण झाले आहे. परंतु या एक वर्षामध्ये तिला कधीच त्रास झाला नाही. म्हणून कुठलीही मोठी शस्त्रक्रिया करण्याआधी किंवा वारदात ॲन्टिबायोटिक्स घेऊनही त्रास कमी होत नसेल तर अत्यंत अल्प खर्चामध्ये होणारी उत्तरबस्ती एकदा तरी करून घेण्यास हरकत नाही. स्त्रियांना होणारा कर्करोग खरोखरच एका छुप्या शत्रूप्रमाणे आजार वाढवतो; कारण कुठल्याही कर्करोगाच्या सुरुवातीच्या अवस्थेत लक्षणे तीव्र स्वरुपात जाणवत नाहीत. अगदी हळूहळू शरीरात या व्याधीचा प्रसार होतो. त्यामुळे बरेचदा कर्करोग अंतिम अवस्थेत पोहोचतो त्या वेळेस त्याची लक्षणे दिसू लागतात. उपचाराला उशीर झाल्यामुळे रोगाचे समूळ उच्चाटन शक्य होत नाही. या अवस्थेतील रुग्णांचे औषधे, केमोथेरपी व रेडिओथेरपीच्या साहाय्याने फक्त आयुष्यमान वाढवता येते. एखादा शत्रू जसा मागून अचानक हल्ला करतो, तसाच कर्करोग छुप्या शत्रूप्रमाणे शरीरावर अचानक हल्ला करतो. याकरिताच स्त्रियांनी चाळीशीच्या दरम्यान वर्षातून एकदा स्त्रीरोग तज्ज्ञांकडून संपूर्ण शरीराची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.

कारण पहिल्या अवस्थेमध्ये कर्करोगाचे निदान झाले तर लहान शस्त्रक्रियेने रोगाचे समूळ उच्चाटन करता येते.

शारीरिक संबंध झाल्यानंतर अंगावरुन रक्तस्त्राव होतो हे लक्षण एका रुग्ण महिलेने मला सांगितले. सोनोग्राफी, पॅपस्मिअर या तपासण्यांमधून तिला गर्भाशयमुखाचा कर्करोग असल्याचे निदान झाले. कर्करोग प्राथमिक अवस्थेमध्ये असल्याचे लक्षात आल्याने लगेचच गर्भाशय निर्हरण शस्त्रक्रिया केली व या रोगापासून तिची पूर्णपणे सुटका केली. या घटनेला सात वर्षे पूर्ण झाली. परंतु अजूनही तिला कुठलाही त्रास होत नाही.

(क्रमशः)

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००





'साईरंग २.०' आय.डी.ए. अहमदनगर दंत वैद्यकीय शाखेतर्फे पुणे आयोजित राज्यस्तरीय दंत परिषद शुभारंभप्रसंगी दंत वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ व पदाधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात राज्यस्तरीय दंत परिषदेत 'डेंटीनोवो' या मॅगझिनचे प्रकाशनप्रसंगी दंत वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ.

# दंतवैद्यकीय शाखेच्या विकासासाठी प्रयत्नशील राहणार

**अध्यक्षा डॉ. मनिषा कुलकर्णी यांचे प्रतिपादन, 'साईरंग २.०' राज्यस्तरीय दंत परिषद**

नगर – दंतवैद्यकीय शाखा नेहमी नवनविन तंत्रज्ञान व आधुनिक उपचार पद्धतीचा खुप सौहार्दपूर्ण स्वीकार करताना दिसुन येते. अहमदनगरच्या डेंटल असोशिएशनच्या माध्यमातून या बदलांचा लाभ सर्व डॉक्टरांना मिळवून देण्यासाठी 'साईरंग २.० परिषदेच्या माध्यमातून अत्याधुनिक तंत्रज्ञान सर्वापर्यंत पोहोचवण्याचा यशस्वी प्रयत्न नुकत्याच पुणे येथे पार पडलेल्या दंतपरिषदेत करण्यात आला.

राज्यस्तरीय परिषदेच्या माध्यमातून विचारांची देवाण घेवाण होऊन संघटनात्मक कार्यावर भार देण्यात आला. नवनवीन उपचार पध्दतीचा उपयोग करून रुग्णांना दिलासा देण्यासाठी अशा परिषदेचा बहुमोल उपयोग होत आहे. सर्व सदस्यांच्या सहकार्याने विविध उपक्रमातून ही राज्यस्तरीय परिषद यशस्वी झाली असल्याची माहिती डॉ. मनिषा कुलकर्णी यांनी सांगितली.

इंडियन डेंटल असोशिएशनच्यावतीने साईरंग २.० या राज्यस्तरीय परिषदेचे पुणे येथे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सबिता राम, डॉ. हेमंत उमरजी, परिषदेचे राज्यस्तरीय सचिव डॉ. विकास पाटील, राज्यस्तरीय अध्यक्ष डॉ. विष्णुदास भंडारी, डॉ. अजित कदम, अध्यक्षा डॉ. मनिषा कुलकर्णी, सचिव डॉ. नेहा जाजू, डॉ. राजलक्ष्मी राय, खजिनदार डॉ. रूपल माचवे, सह–खजिनदार डॉ. पल्लवी चेडे आदि उपस्थित होते.

यावेळी डॉ. संतोष दिक्षित यांनी बेसिक इंम्लॉटॉलॉजी या विषयावर तसेच डॉ. चंद्रकांत सारंगकर यांनी रोटरी एन्डोडोन्टीक्स या विषयावर मार्गदर्शन तसेच कार्यशाळा घेतली या कार्यशाळेसाठी जवळपास ३२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

या परिषदेच्या निमित्ताने ''डेंटीनोवो'' या मॅग्झीनचे प्रकाशनही पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व सदस्यांना मॅग्झीनच्या निमित्ताने विविध कलादर्शन तसेच अत्याधुनिक उपचार वापरून पूर्ण केलेल्या रुग्णांच्या केसेस सादर करावयास विचारपीठ मिळाले. या मॅग्जीनचे संपादक डॉ. अमृता देडगावकर यांचे मोलाचे योगदान लाभले. दंतवैद्यकीय शाखेत शिकत असणाऱ्या विद्यार्थांसाठी पेपर व पोस्टर प्रेझेंटेशन घेण्यात आले व उल्लेखनीय पेपर व पोस्टरर्स ना पारितोषिकाने सन्मानित ही करण्यात आले. डॉ. शैल जग्गी, डॉ. लिशा जैन, डॉ. शरद शेट्टी, डॉ. निरंजन वटकर, डॉ. हेमंत उमरजी आणि डॉ.रुचिका सुद या तज्ञ व्यक्तिचें मार्गदर्शन सर्व सभासदांना लाभले.

'या सर्व अभ्यासपूर्ण विचारमंथनाने सभागृह भारावुन गेले.' सर्व लहान मुले व डेंटिस्टेतर मंडळींसाठी 'गोष्टरंग' या खास व आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या परिषेदेसाठी डॉ. प्राची पाटील, डॉ. अरुणा भंडारी, डॉ. फातिमा शेख, डॉ. अविनाश वारे, डॉ. चंद्रकांत डुंगरवाल, डॉ. दत्तात्रय पंडित, डॉ. भाऊसाहेब लांडे, डॉ. संजय खेडकर, डॉ. अभिजित मिसाळ, डॉ. वैशाली पाटील, डॉ. सोनिया औटी, डॉ. मुस्कान तलरेजा, डॉ. ओंकार कुलकर्णी, डॉ. विनोद मोरे, डॉ. विवेकानंद चेडे, डॉ. कृष्णा जाजु, डॉ. अशोक कोल्हे, डॉ. गुरुप्रसाद हंडाळ, डॉ. योगीराज वीरकर, डॉ. निलकंठ म्हस्के, डॉ. आशिष रोराळे, डॉ. अभिजित होशिंग, डॉ. प्रतिक वैरागर, डॉ. सुमित नलवडे, डॉ. विजय सोनवने, डॉ. नितिश इंगळे, डॉ. अक्षता हंडाळ यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

डॉ. दिपाली काशीद, डॉ. प्राची पंडीत, डॉ. प्राजक्ता सावेडकर, डॉ. धनश्री अबुज, डॉ. रुतुजा फिरोदिया यांच्या प्रभावी सुत्रसंचालनाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. तसेच ज्यांच्या शिवाया हा परिषदेचा गोवर्धन उचलूच शकला नसता असे डॉ. शिल्पा इनमुलवार, डॉ. सोनम मुथीयान, डॉ.अक्षता हंडाळ, डॉ. पायल धुत, डॉ. सौरभ पंडीत, डॉ. पुनम मुळे, डॉ. अभिषेक मुळे, डॉ. योगेश सोनवणे, डॉ. ओंकार भालसिंग, डॉ. प्रिया भालसिंग, डॉ. प्राजक्ता झावरे, डॉ.पुजा गायकवाड आदी मंडळीनी मोलाचे सहाकार्य दिले.

डॉ. संजिवनी जरे, डॉ. वर्षा शिंदे, डॉ. किर्ती कोल्हे, डॉ. दिपाली गव्हाणे, डॉ. रेयाली गजरे, डॉ.अमृता देडगावकर, डॉ. कुणाल कोल्हे, डॉ. ऋतुजा फिरोदिया, डॉ. रुचि अट्टल, डॉ. मयुरी शिंदे, डॉ. विश्वजीत देशमुख, डॉ. प्राची चुडीवाल, डॉ. मोनाली बोर्हाडे, डॉ. अश्लेषा सोनवणे, डॉ. प्रतिक अट्टल, डॉ. प्राचि इंगळे, डॉ. किरण माचवे, डॉ. अंकुश अनारसे, डॉ. संदिप पवार, डॉ. सलमान शेख, डॉ. प्रमोद निकरड, डॉ. अतुल मडावी, डॉ. ममता डुंगरवाल, डॉ. किरण सेठीया, डॉ. स्वाती चंगेडिया, डॉ. दिपक वैद्य, डॉ. सागर शिंदे, डॉ. अमृता अनारसे, डॉ. हर्षा गांधी, डॉ. रोहन बनसोडे, या मंडळींची ही महत्वपुर्ण योगदान परिषदेसाठी लाभले.

कार्यक्रमाच्या शेवटाकडे येताना डॉ. अविनाश वारे म्हणाले– 'ज्याप्रमाणे प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो तसेच प्रत्येक यशस्वी स्त्रीमागेही एका पुरुषाची खंबीर साथ असते.' त्याप्रसंगी डॉ. मंगेश कुलकर्णी व डॉ. कृष्णा जाजु यांचा प्रमुख पाहुण्यांचा हस्ते सत्कार करण्यात आला. सर्व मान्यवरांचे मनापासून आभार मानुन सचिव डॉ.नेहा जाजूनी कार्यक्रमाची सांगता केली.

# चेकचा अनादर झाल्याप्रकरणी आरोपीस अकरा लाख अठ्ठेचाळीस हजार रुपये दंड

नगर – येथील १९ वे अतिरिक्त चीफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट कर्वे यांनी प्रल्हाद पुंजाजी खळे (रा. गुगळे कॉलनी, बुऱ्हाणनगर, ता. जि. अहमदनगर) यास निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अ‍ॅक्ट कलम १३८ मध्ये दोन महिन्याचा कारावास व ११,४८,००० रु. (अकरा लाख अठ्ठेचाळीस हजार रुपये) आरोपीस दंड केला. दंडाच्या रक्कमेतून फिर्यादी राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शाखा ता.जि.अहमदनगर यांना ११,४५,००० रुपये देण्याचा हुकुम केलेला आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम न भरल्यास पंधरा दिवसांच्या कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत शाखा सर्जेपुरा ता. जि. अहमदनगर येथुन प्रल्हाद पुंजाजी खळे याने हॉटेल व्यवसायाकरीता १२/०९/२०१६ रोजी रु.१५,००,००० (रुपये पंधरा लाख) चे कर्ज घेतले होते. कर्ज थकीत गेल्यानंतर थकीत रकमेपोटी रु.७,५७,६१९ (सात लाख सत्तावन हजार सहाशे एकोनीस) चा चेक २८/१२/२०१८ रोजीचा त्यांचा खाते असलेला बँक ऑफ बडोदा शाखा एम आय डी सी, ता.जि.अहमदनगर या बँकेचा चेक दिलेला होता. तो फिर्यादी पतसंस्थेने अहमदनगर शहर सहकारी बँक, शाखा नवीपेठ, ता.जि.अहमदनगर येथे बँकेत भरला असता खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे तो न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने प्रल्हाद पुंजाजी खळे यांच्याविरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अ‍ॅक्ट कलम १३८ प्रमाणे संदिप तात्याबा म्हस्के यांच्यातर्फे केस दाखल केली होती, त्याचा निकाल लागला असून आरोपीस शिक्षा सुनावली आहे. फिर्यादी पतसंस्थेतर्फे अ‍ॅड. बाबासाहेब एन. रणसिंग व अ‍ॅड. विनोद बी. रणसिंग यांनी काम पाहिले.

# संस्कृती ढगे हिचे निट परीक्षेत यश

नगर – शहरातील कल्याणरोड, आदर्शनगर येथील कु. संस्कृती ढगे हिने निट परीक्षेत उत्तम गुण मिळवून घवघवीत यश प्राप्त केले. जीवशास्त्र विषयात ३६० पैकी ३२६ गुण प्राप्त करुन व सर्व विषयात ५५७ गुण मिळवून तिने आपली गुणवत्ता सिध्द केली.



संस्कृती ढगे हिने निट परीक्षेत घवघवीत यश मिळविल्याबद्दल तिचा सत्कार करताना प्रा. एल. बी. जाधव. समवेत प्राचार्य शरद मेढे.

जीवशास्त्र विषयासाठी तिला प्रा. एल. बी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. जाधव सरांनी घेतलेल्या सरावामुळे व मार्गदर्शनाने जीवशास्त्र विषयात चांगले गुण प्राप्त करता आल्याची भावना ढगे हिने व्यक्त केली. संस्कृतीचे वडिल संतोष ढगे व आई मंगल ढगे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक असून लहानपणापासूनच आपल्या मुलीची आवड पाहून तिला शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे काम केले.

संस्कृती ढगे हिने मिळवलेल्या यशाबद्दल तिचा प्रा. एल. बी. जाधव यांनी सत्कार केला. प्राचार्य शरद मेढे, प्राचार्य विलास साठे, प्रा.डॉ. महेबुब सय्यद, प्रकाश मेढे, प्रा. डि. आर. जाधव, डॉ. ननवरे, प्रा.हनुमंत गायकवाड, थोरात, प्रा. सुर्यवंशी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.



लांबच्या शाळेत पायी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकलची भेट देताना बोडखे परिवारातील विराज बाबासाहेब बोडखे. समवेत महेंद्र हिंगे, बाबासाहेब शिंदे आदी.

# लांबच्या शाळेत पायी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकलची भेट

नगर – लांबच्या शाळेत पायी जाणाऱ्या हुशार व होतकरू गरजू विद्यार्थ्यांना शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे यांच्यावतीने सायकल वाटप करण्यात आले. नुकतेच शाळा सुरु झाली असून, मुला – मुलींना लांबच्या शाळेत पायी जावे लागत असल्याने श्री. बोडखे यांनी विद्यार्थ्यांना सायकलची व्यवस्था करुन दिली.

केशवराव गाडीलकर विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्यात आली. यावेळी माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, मुख्याध्यापक बाबासाहेब शिंदे, विराज बाबासाहेब बोडखे आदी उपस्थित होते.

महेंद्र हिंगे म्हणाले की, गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता बाबासाहेब बोडखे सातत्याने विविध उपक्रमातून आधार देण्याचा प्रयत्न करत आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांपासून ते गरजू विद्यार्थ्यांना ते वर्षभर शैक्षणिक मदत देत असतात. अनेक विद्यार्थी त्यांनी शिक्षणासाठी दत्तक घेतले असून, गरजू विद्यार्थ्यांना ते विविध प्रकारची मदत करत आहे. बिकट परिस्थितीतून आलेले बोडखे यांचे शिक्षण क्षेत्रात गरजू विद्यार्थ्यांना आधार देण्याचे सुरु असलेले कार्य दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

बाबासाहेब बोडखे म्हणाले की, आजचे विद्यार्थी हे उद्याच्या सक्षम भारताचे भवितव्य आहे. त्यांचे भवितव्य उज्वल घडल्यास देश सक्षम होणार आहे. यासाठी प्रत्येकाने गरजू घटकातील विद्यार्थ्यांसाठी हातभार लावण्याची गरज आहे. बिकट परिस्थितीतून शिक्षण घेताना आपल्यावर आलेली वेळ या विद्यार्थ्यांवर येऊ नये, या भावनेतून त्यांना सातत्याने मदत करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी सायकल मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# विविध योजनांच्या माध्यमातून पतसंस्था सभासद व कुटूंबियांचीही काळजी घेत आहे

**आमदार संग्राम जगताप**




अहमदनगर वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेचे वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले.

**अहमदनगर वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेचे वार्षिक सर्वसाधारण सभा**

नगर – कोणतीही संस्था ही त्या संस्थेतील चांगल्या संचालक मंडळाच्या कारभाराने प्रगती पथावर राहत असते. अहमदनगर वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था गेल्या तीस वर्षांपासून सभासदाच्या उन्नत्तीसाठी काम करत आहे. सभासद, कर्जदार, ठेवीदारांच्या सहकार्याने पतसंस्थेची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. सभासदांची आर्थिक उन्नत्ती साधण्याबरोबरच त्यांचा अपघात विमा, वैयक्तिक विमा, गुणवंत पाल्यांचा सन्मान, कन्यादान योजना, स्त्री जन्माचे स्वागत, आहेर योजना, सेवानिवृत्ती योजना अशा योजनांच्या माध्यमातून सभासदांबरोबर त्यांच्या कुटूंबियांचीही काळजी घेण्यात येत आहे. पतसंस्थेचे सुरु असलेले कार्य कौतुकास्पद असून, सभासदांच्या भवितव्यासाठी सुरु असलेल्या उपक्रमास आपले नेहमीच सहकार्य राहील, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

अहमदनगर वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेचे वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थापक शिरिष गायकवाड, अशोक पाथरकर, इब्राहिम हवालदार, रघुनाथ लाड, दतू भोईर, माऊली बडधे, सतीश लोहगांवकर, चंद्रकांत सुरवसे, संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष सतीश भुजबळ, शंकर जारकड, चेअरमन संतोष शेलार, व्हाईस चेअरमन आशिष वेळापुरे, सचिव रुपेश चाकणे उपस्थित होते.

यावेळी सतीश भुजबळ म्हणाले, स्वाभिमानी तांत्रिक पॅनेलच्या माध्यमातून गेल्यावेळी या पतसंस्थेत सत्तांतर झाले. त्यानंतर पतसंस्थेच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन व सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने गेल्या दोन वर्षांपासून पतसंस्थेने पारदर्शक कारभार करुन ऑडिट वर्ग 'अ' मिळविला आहे. सभासदांचे हित जोपासण्याचे काम संचालक मंडळाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे भविष्यात ही संस्था आणखी प्रगती करेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी चेअरमन संतोष शेलार म्हणाले, ज्या संचालक मंडळांनी तीस वर्षांपूर्वी सहकार क्षेत्रात पतसंस्थेचे जे रोपटे लावले त्या रोपट्याचा आज वटवृक्ष झालेला आहे. स्वाभिमानी तांत्रिक पॅनल सत्तेवर आल्यापासून संस्थेचा कारभार हाती घेतल्यापासून सभासदांना जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी विविध योजना राबविण्यावर भर देण्यात येत आहे. काटसरीचे संस्थेचे कारभार संचालक मंडळाच्या सहकार्याने सुरु असून, सभासदांच्या उन्नतीसाठी जास्तीत जास्त उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे सांगितले.

यावेळी व्हाईस चेअरमन आशिष वेळापुरे म्हणाले, सर्व संचालक मंडळाच्या विचार विनिमय करुन सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले जात आहेत. गेल्या वर्षी काही वर्षात पतसंस्था प्रगतीपथावर आहे. यंदाच्या वर्षी सभासदांच्या मागणीनुसार सेवानिवृत्ती योजन व इतर विविध योजना राबवत असलेल्या मानधन रकमेत दुपटीपेक्षा जास्त प्रोत्साहन म्हणून देण्यात येण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच गुणवंत पाल्यांच्या शालेय बक्षिस योजनेही सुरु करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी सचिव रुपेश चाकणे यांनी संस्थेच्या वार्षिक अहवाल सादर करुन. पतसंस्थेच्या माध्यमातून प्रगतीचा आढावा सादर केला. सभेच्या विषयी पत्रिकेतील सर्व विषयांना उपस्थित सभासदांना बोलण्याची संधी देण्यात आली व म्हणणे ऐकून घेत शंकाचे निरसन करण्यात आले. यावेळी निसर्ग संवर्धनासाठी सर्व सभासदांना वृक्ष वाटप करण्यात आले.

यावेळी तज्ञ संचालक प्रवीण जठार, संचालक बाळासाहेब जावळे, संतोष भिंगारदिवे, सचिन चोरगे, किशोर काळे, कुशाबा वायसे, अरुण भोसले, सचिन सुडके, अरविंद पाठक, प्रवीण देशमुख, सोमनाथ क्षीरसागर, अशोक मते, श्रीमती सुनिता मेढे, श्रीमती उषा मिसाळ, व्यवस्थापक दिलीप घोडेचोर, बळीराम गायकवाड, दीपक हुशारे आदींनी सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले.



संदेश रपारीया यांना अहिल्यादेवी होळकर समाजभूषण पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला. (छाया – समीर मन्यार)

# अहिल्यादेवी होळकर समाजभूषण पुरस्कार संदेश रपारीया यांना प्रदान

नगर – प्रहार दिव्यांग संघटनेचे शहराध्यक्ष संदेश रापारिया यांना निस्पृह सेवेच्या सन्मानार्थ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून अहिल्यादेवी होळकर समाजभूषण पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.



यशवंत सेना अहिल्यानगर जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा नुकताच झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धनगर समाजाचे महाराष्ट्र राज्य मल्हार सेनेचे सरचिटणीस मच्छिंद्र बिडगर हे होते प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय तमनर, डॉ. अशोक भोजने, समाधान बागल, प्रहार सरचिटणीस नाशिक जिल्हा शशिकांत कोथमिरे, श्रावण महाराज वाघमोडे, राजेंद्र पोकळे, प्रेमानंद महाराज, डॉ. श्रीकांत चेमटे, सरपंच गणेश हारदे, शशिकांत कोथमिरे, मारुती कदम, किसन बोंद्रे, साहिल काजी, निलेश राऊत सरपंच, ह भ प. रामचंद्र महाराज थोरात, प्रा.आनंद कटारिया, डॉ. रेखाताई लोकनर(ग्वाल्हेर), नीलम जाडकर, ज्योती उनवणे, अजय जाडकर, राहुल तमनर, आदींसह सर्व यशवंत सैनिक उपस्थि होते

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत सेनेचे अध्यक्ष कांतीलाल जाडकर यांनी केले. सूत्रसंचालन आप्पासाहेब ढोकणे व छायाताई बंडगर यांनी केले. आभार रमेश खेमनर यांनी मानले.

# एमआयडीसीतील आयकॉन मोल्डर्सच्या कामगारांना पगारवाढ

**अखिल भारतीय कामगार सेना व आयकॉन मोल्डर्समध्ये करार : बक्षीस, बोनस, वार्षिक सहल, पगारी रजा व सुट्ट्यांचा कामगारांना मिळणार लाभ**

नगर – अखिल भारतीय कामगार सेना व एमआयडीसी येथील आयकॉन मोल्डर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्यात नुकताच करार होऊन, कर्मचाऱ्यांना ७ हजार रुपयांची पगारवाढ देण्यात आली. त्याचबरोबर काम गारांना बक्षीस, बोनस, वार्षिक सहल, पगारी रजा व सुट्ट्या व कामगार कायद्याप्रमाणे इतर लाभ नवीन करारानुसार मिळणार आहे. हा करार १ एप्रिल २०२४ पासून ते ३१ मार्च २०२७ पर्यंत तीन वर्षासाठी करण्यात आला आहे.

१५ ते १६ वर्षापासून करार न झाल्याने मागील काही वर्षापासून अखिल भारतीय कामगार सेनेच्या वतीने कंपनी व्यवस्थापनाकडे पाठपुरावा सुरु होता. अखिल भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस राजेश पाटील व जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब उनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कंपनी व्यवस्थापनासह बैठक पार पडली. या बैठकीत झालेल्या कराराने कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

वेतनवाढीच्या करारावर कामगार युनियनच्या वतीने राजेश पाटील, भाऊसाहेब उनवणे, कामगार प्रतिनिधी आनंद बारस्कर, नितीन उजागरे, युनिट अध्यक्ष एडकेताई यांचे तर कंपनी व्यवस्थापनातर्फे संचालक बिजल शेठ यांनी सह्या केल्या. यावेळी कामगार संदीप निमसे, नितीन उजागरे, आनंद बारस्कर, अशोक सबीन, संजय नरसाळे, मयूर बारस्कर, शिवाजी दरेकर आदी उपस्थित होते.

कंपनीचे बिजल शेठ यांनी कंपनीतील कामगारांना भरीव पगारवाढ देण्यात आली आहे. तसेच कामगार कायद्यांचा लाभ देखील त्यांना मिळणार आहे. कर्मचाऱ्यांना १ एप्रिल २०२३ पासून फरकाची रक्कम देखील लवकरच अदा केली जाणार असून, युनियन व कंपनी व्यवस्थापनाचे अत्यंत सौजन्याचे नाते असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भाऊसाहेब उनवणे म्हणाले की, कंपनीतील कामगारांना महागाईच्या काळात सन्मानाने जगता यावे, यासाठी कंपनी व्यवस्थापनाशी पाठपुरावा करुन त्यांचा वेतनवाढीचा प्रश्न मार्गी लावण्यात आला आहे. यासाठी संघर्षाची वेळ न येता, कंपनीकडूनही मोठे सहकार्य मिळाले. या करारामुळे कामगार व कंपनीचे आणखी चांगले भावनिक नाते निर्माण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. युनिट अध्यक्षा एडकेताई यांनी युनियनच्या पाठपुराव्यामुळे कामगारांना पगारवाढ शक्य झाली असून, युनियन व कंपनी व्यवस्थापनाचे त्यांनी आभार मानले.



आयकॉन मोल्डर्सच्या कामगारांना पगारवाढीच्या करार अखिल भारतीय कामगार सेवा व आयकॉन मोल्डर्स कंपनीतर्फे करताना राजेश पाटील, भाऊसाहेब उनवणे, श्रीमती एडके, बिजल शेठ आदी.

# विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी समाजाने पुढाकार घेणे गरजेचे

### जितेंद्र साळी यांचे प्रतिपादन



कल्याण रोड, ड्रिमसिटी मागील लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिर संचलित संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत पिण्याच्या पाण्याच्या जलकुंभाचे उद्घाटन स्वकूळ साळी विद्यार्थी सहाय्य मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र उद्धव साळी यांच्या हस्ते झाले.

## स्ववकूळ साळी विद्यार्थी सहाय्य मंडळाच्यावतीने कनोरे प्रशालेस जलकुंभ

नगर - विद्यार्थी समाजाचे भुषण आहेत, त्यामुळे त्यांना शिक्षण घेताना कोणत्याही प्रकारची अडचणी येऊ नये यासाठी समाजधुरिंणी पुढाकार घेणे गरजेचे आहे. स्वकूळ साळी विद्यार्थी सहाय्य मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेण्यात येत असून, त्यांचा फायदा घेऊन विद्यार्थी आपले भविष्य घडवत आहेत. नगरमधील समाजाच्या या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी जलकुंभाची भेट आम्ही मंडळाच्यावतीने दिली आहे. सर्वसामान्य कुटूंबातील मुलांना चांगले शिक्षण देऊन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिर काम करत आहे. त्यांच्या कार्यास आमच्या मंडळाचे नेहमीच मदतरुपी सहकार्य राहील, असे प्रतिपादन स्वकूळ साळी विद्यार्थी सहाय्य मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र साळी यांनी केले.

कल्याण रोड, ड्रिमसिटी मागील लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिर संचलित संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत पिण्याच्या पाण्याच्या जलकुंभाचे उद्घाटन स्वकुळसाळी विद्यार्थी सहाय्य मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र उद्धव साळी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपाध्यक्ष चंद्रशेखर बावगाजे, प्रदीप ढोरे, सचिव शिवाजी मिसाळ, सह खजिनदार सुभाष कप्पे, विश्वस्त दत्ता साळी, घन:श्याम सरोदे आदि उपस्थित होते.

पुढे बोलतांना जितेंद्र साळी म्हणाले, उच्च शिक्षण घेण्यासाठी मुंबईत येणाऱ्या विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था आमच्या मंडळाद्वारे केली जाईल. तसेच शैक्षणिक अडचणी संदर्भातही मार्गदर्शन केले जाईल, असे सांगितले.

स्वकूळ साळी विद्यार्थी सहाय्य मंडळ मुंबई यांनी काही दिवसापूर्वी प्रशालेस भेट दिली असता, पिण्याच्या पाण्याची समस्या लक्षात घेता त्यांनी प्रशालेसाठी जलकुंभ देण्याचे मान्य केले होते. त्यांचे काम जलद पूर्ण करुन प्रशालेसाठी तो खूला करण्यात आला.

यावेळी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे मुख्य विश्वस्त अरविंद धिरडे, खजिनदार संजय सागावकर, गजेंद्र सोनवणे, कृष्णा बागडे, सचिन मडके, बाबासाहेब वैद्य, शालेय समितीचे चेअरमन जितेंद्र लांडगे, व्हाईस चेअरमन मृणालताई कनोरे, सचिव विक्रम पाठक, मुख्याध्यापिका कल्पना भामरे, शिक्षकवृंद व पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी शालेय समितीचे चेअरमन जितेंद्र लांडगे यांनी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न केले जात आहे. अनेकांच्या सहकार्याने शाळेत विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. स्वकूळ साळी विद्यार्थी सहाय्य मंडळाने जलकुंभासाठी दिलेले सहकार्य अनमोल आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली असल्याचे सांगितले.

प्रास्तविकात मुख्याध्यापिका कल्पना भामरे यांनी प्रशालेच्या प्रगतीचा आढावा सादर करुन राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचान गजेंद्र सोनवणे यांनी केले तर आभार संजय सागावकर यांनी मानले.

# अस्थमा का वाढतो?

अस्थमा असंसर्गजनक असून सर्व वयोगटात आढळतो. यात श्वासनलिका लाजाळूच्या झाडाप्रमाणे आकुंचित होतात व सुजतात, परिणामी जास्त कफ तयार होतो व श्वास घेण्यास अडचण होते. याचे कारण एलर्जीच्या दाहक मध्यस्थ होय.

पर्यावरणात बदलत्या ऋतू व प्रवृत्त करणारे घटक बघता श्वसनावर पूर्णपणे ताबा मिळवणे अशक्य आहे.

गार वारा हा स्वतःच एक मुख्य ट्रिगर असून पराग कणे, बुरशी, ओलसरपणा, धूळ, फ्लू विषाणू हे अस्थमा अटॅक चे मुख्य कारणे असून याचे निमोनियात रूपांतर होते.

आधीच असुरक्षित असलेला श्वसन मार्ग जेव्हा या प्रवृत्त करणाऱ्या घटकांशी संपर्कात येते तेव्हा लक्षणे दिसून येतात व वाढतात, जसे घर घर होणे, खोकला येणे, दम लागणे, छातीत घट्टपणा जाणवणे, सर्दी किंवा नाक चोंदणे इत्यादी. अशा लोकांनी त्वरित डॉक्टरांशी संबंध साधून उपचार घ्यावे

### काय काळजी घ्यावी?

**स्वच्छता बाळगा** : गुळ, धूर, गार वारा, तीव्र वास म्हणजे अत्तर तडका, कृत्रिम रसायने, ओल्या भिंती, कबुतरांपासून दूर रहा

**गरजेनुसार मास्क वापरा** : इन्हेलर ही असरदार सूक्ष्म कुशल सुरक्षित व प्रगत उपचार पद्धती अस्थमाचा प्रभाव कमी करते.

यात औषध मायक्रोग्राम्स मध्ये असून ते थेट श्वासनलिकापर्यंत पोहोचवते व श्वासनलिकांना आराम देऊन श्वास घेण्यास त्वरित आराम देते. इन्हेलर हे औषध पोटात रक्तात जात नसून स्थानिकपणे मलमा सारखे फुफुसांपर्यंत पोहोचवते. इन्हेलर थेरेपी ही सर्व वयोगटांसाठी योग्य आहे.

निमोनिया टाळण्याकरिता आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधून प्रौढांचे लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरणामुळे आपण संक्रमणापासून दूर राहतोच पण संक्रमण झाल्याच त्याचा दाह कमकुवत राहतो व जीव वाचवण्यास त्याचा मुख्य हातभार ठरतो. वार्षिक रित्या इन्क्लूंचा व आयुष्यात एकदा निमोकोकल लसीकरण ही मार्गदर्शन सूचना जीवनदायीनी ठरते.

चला मग त्रासाला ओळखू या, प्रवृत्त करणाऱ्या घटकांना जाणूया, प्रभावी उपचार घेऊया, म्हणजेच असतं मला हरवूया.



**- डॉ. निखिल चिल्लाळ,**
श्वसन रोग तज्ज्ञ,
दर शुक्रवारी नगरमध्ये
मुथा चेंबर्स,
माळीवाडा, अहमदनगर
संपर्क : ९३५९२६०२५०

# नवीन शैक्षणिक धोरणाविषयी बारावी पास विद्यार्थ्यांना २७ जूनला नगरमध्ये मार्गदर्शन



नगर - बारावी पास विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणातील संधीविषयी न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात गुरुवारी (दि.२७ जून) मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्ट्स कॉमस ॲण्ड सायन्स महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरण २०२०, स्कूल कनेक्ट (एनईपी कनेक्ट) या अभियानांतर्गत नवीन शैक्षणिक धोरणाच्या जाणीव व जागृतीच्या उद्देशाने ही कार्यशाळा होणार आहे.

या कार्यशाळेत बारावीत शिकत असलेले व उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, डॉ. दिलीप ठुबे, प्रा. कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक श्री. गोरे यांनी केले आहे.

सकाळी १०.३० वाजता या कार्यशाळेला प्रारंभ होणार आहे. या कार्यशाळेत बारावी मधील विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शैक्षणिक व्यवस्थेत झालेल्या बदलांसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाच्या नवीन संधी कशा मिळवता येऊ शकतात? याचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये दिशाहीन न होता, योग्य त्या दिशेने जावे व आपले ध्येय साध्य करावे यासाठी ही कार्यशाळा महत्त्वाची ठरणार आहे.

या कार्यशाळेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तयार केलेल्या मार्गदर्शक व्हिडिओचे प्रक्षेपण करण्यात येणार आहे. तसेच डॉ. मंगेश वाघमारे यांचे विशेष व्यख्यान होणार आहे. १२ वी पास झालेल्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या कार्यशाळेचा लाभ घेण्याचे म्हंटले आहे. या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. नागेश शेळके यांच्याशी सपंर्क साधून नाव नोंदणी करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# ओंकार संगीत निकेतनची यशाची उज्वल परंपरा कायम



अखिल भारतीय गांधर्व विद्यालयाच्या मे २०२४ सत्रातील परीक्षांमध्ये ओंकार संगीत निकेतनच्या भिंगार व दरेवाडी शाखेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत संचालिका संगीता देऊळगावकर.

नगर - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या मे २०२४ सत्रातील परीक्षांमध्ये ओंकार संगीत निकेतनच्या भिंगार आणि दरेवाडी शाखेच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे गायन/हार्मोनियम विषयामध्ये प्रारंभिक गायन - रोशनी बोरा व साची गुंदेचा या प्रथम श्रेणीत तर सिमरन मुनोत, मोक्षदा मोहिते या द्वितीय श्रेणीत तर आदर्श मजूकर, प्रेम मजूकर, राधिका जगताप, रिद्धी मेहेर, गौरी सुतार, साहिला कोकणे सर्व विशेष योग्यतेत.

प्रवेशिका प्रथम गायन स्नेहल धाडगे, वैष्णवी कोल्हे, माधुरी मेढे, शिवराज धाडगे हे प्रथम श्रेणीत तर राधिका कोल्हे, अनुज दरवडे सर्व विशेष योग्यतेत. प्रवेशिका पूर्ण - रुपाली केदारे, समृध्दी केदारे, प्रीती गांधी, वैष्णवी पालवे सर्व प्रथम श्रेणीत, त्याचप्रमाणे प्रारंभिक हार्मोनियम साक्षी शिंदे , स्टेफी केल, शिवदीप साके सर्व विद्यार्थी विशेष योग्यतेत. प्रवेशिका प्रथम हार्मोनियम वैभवी चव्हाण, ईश्वरी ननवरे, हे विशेष योग्यतेत तर श्रद्धा गौड, पायल राऊत, संस्कृती कोठुळे, श्रद्धा शिंदे, वैष्णवी चव्हाण सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

प्रवेशिका पूर्ण गायत्री धनलगडे, सानिका, अक्षरा घुटे, दर्शन जावळे हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. विशारद प्रथम हार्मोनियम नेहा दरवडे उत्तीर्ण.

तबला विषयामध्ये प्रारंभिक ईश्वर पेगड्याल, विराज सागडे, विशाल गवारे, शिवम मराठे, सर्वज्ञ दरवडे, प्रतीक्षा ठोंबरे, सुयश साठे, पवन रणमले सर्व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण प्रवेशिका पूर्ण विराज लवांडे, अखिलेश शेदाळे, कृष्णा लाढणे प्रथम श्रेणी. मध्यमा प्रथम - रवींद्र मगर प्रथम श्रेणी. मध्यमा पूर्ण - आदित्य बुधवंत, विजय बोरुडे प्रथम श्रेणी तर प्रथमेश शिंदे द्वितीय श्रेणी. विशारद प्रथम -आदित्य सुपेकर प्रथम श्रेणीत उत्तीर्ण विशारद पूर्ण - अभिषेक खंडागळे हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. विद्यार्थ्यांना ओंकार संगीत निकेतनच्या संचालिका संगीता देऊळगांवकर, शेखर दरवड़े, ओंकार देऊळगांवकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# इम्पेट्स अबॅकस क्लासेसमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

नगर - शालेय शिक्षण घेताना जर गणित विषयाचा पाया पक्का नसेल आणि त्याची गोडी लागली नाही तर मुले स्पर्धेच्या युगात मागे पडतात. त्यामुळे वैदिक गणित किंवा अबॅकस हा कोर्स पूर्ण करून या विषयात तरबेज होणे आवश्यक आहे. त्यासाठी शास्त्रशुद्ध तंत्र वापरून अबॅकस शिकणे आवश्यक आहे. हे तंत्र पुणे येथील इम्पेट्स अबॅकस क्लासेसने अभ्यासपूर्ण रीतीने विकसित केलेले असून या विषयाचे ऑनलाईन प्रवेश सुरु झाले आहेत. सध्याच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी गणित विषयात मुलांना गती असणे गरजेचे झालेले आहे.

हीच बाब हेरून अतिशय कल्पकतेने, रंजकता वापरून मुलांना अबॅकस आणि वैदिक गणित शिकवणाऱ्या पुण्यातील एम्पेट्स क्लासेस ची शाखा नगरमध्ये ऑफलाईन सुरु होणार आहे. त्यासाठी ते फ्रॅन्चाइसी देणार आहेत. शिकलेल्या गृहिणी, युवती आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ही एक संधी आहे. याबद्दल अधिक माहिती हवी असल्यास www.impetusclasses.com या वेबसाईट वरून माहिती घ्यावी किंवा ८४१२०३३३९९, ९५६११६५२२२ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन इम्पेट्स क्लासेसच्या प्राचार्या सौ. इंदू खांडेकर यांनी केले आहे.

५ ते १४ वर्षांपर्यंतच्या मुलाच्या बुध्दीचातुर्यासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी हे क्लास उपयुक्त आहेत. पैकी अबॅकस क्लासच्या आठ लेव्हल असतील तीन महिन्याची एक लेव्हल असेल तर वैदिक गणिताच्या ४ लेव्हल असतील. आणि प्रत्येक लेव्हल दोन महिन्याची असेल. आणि या दोन्ही प्रकारच्या प्रत्येक लेव्हलला रोज २ तासांचा क्लास घेतला जाईल.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अहमदनगर शहरातील श्री रामअवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर मध्ये बालक पालक योगासन स्पर्धेमध्ये विजेत्या स्पर्धकांसमवेत जिल्हा योगासन संघटनेचे राष्ट्रीय पंच प्रणिता तरोटे, नयन थोरात, आप्पा लाडाने, ऋतुजा वाल्हेकर, अक्षता गुंड पाटील आदी.

# अहमदनगर शहरामध्ये झालेल्या बालक पालक योगासन स्पर्धेचे बक्षीस वितरण

नगर - २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अहमदनगर शहरातील श्री रामअवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर मध्ये बालक पालक योगासन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेच्या माध्यमातून बालकांसोबतच पालकांमध्ये योगासनाची आवड निर्माण व्हावी व घराघरात योगा पोहोचावा या उद्देशाने ट्रस्टी मोहन मानधना यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा घेण्यात आली, अशी माहिती सेंटरचे प्रमुख प्रशिक्षक उमेश झोटिंग यांनी दिली.

विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेत पंच म्हणून जिल्हा योगासन संघटनेचे राष्ट्रीय पंच प्रणिता तरोटे नयन थोरात आप्पा लाडाने, ऋतुजा वाल्हेकर, अक्षता गुंड पाटील यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांक सौ. जयश्री हराळे व कु. धनश्री हराळे., द्वितीय क्रमांक सौ. शलाका सराफ व कु.ओवी सराफ, तृतीय क्रमांक अभिजीत हम्पे व कु.अर्णव वैष्णवी हम्पे, उत्तेजनार्थ १) सौ. श्वेता मुळे व कु.राजवी मुळे २) सौ. गीतांजली शिंदे व अवनी शिंदे.

# महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्काराने नगरच्या अनितताई काळे सन्मानित



मुंबईत नगरच्या शिक्षिका अनिता काळे यांना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्काराने सन्मानित करताना श्रीमंत संभाजीराजे जाधव. समवेत उद्योजिका संगीताताई गुरव, महादेव देवळे आदी.

नगर - शिक्षिका तथा मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे यांना मुंबईत महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने आझाद मैदान येथील पत्रकार भवनात ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ (लखुजी जाधवराव) यांचे सोळावे वंशज श्रीमंत संभाजीराजे जाधव यांच्या हस्ते काळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्यासाठी उद्योजिका संगिताताई गुरव, मॉडेल स्मिता भोसले-धुमाळ, मुंबई महापालिकेचे माजी महापौर महादेव देवळे, सुभाष गायकवाड, तेजस्विनी गलांडे, स्वागिताध्यक्ष देवानंद कांबळे, महासंघाचे अध्यक्ष प्रकाश जाधव, सचिव सुरज भोईर आदी उपस्थित होते.

अनिता काळे या सामाजिक क्षेत्रात मागील पंचवीस वर्षापासून सातत्याने सक्रीय योगदान देत आहेत. त्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असून, सर्वसामान्य घटकातील मुला-मुलींना विद्या दानाचे पवित्र कार्य करुन शालेय मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी ज्युदो व लाठी-काठीचे प्रशिक्षण मोहिम चालवित आहे.

महिला सक्षमीकरणाचे कार्य करुन त्यांनी उत्तम प्रकारे महिलांचे संघटन केले आहे. व्याख्यानातून राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार घराघरात पोहचवून सक्षम पिढी घडविण्याचे त्यांचे कार्य सुरु आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# राज्यस्तरीय वधू-वर सुचक मेळाव्यात अनेकांनी नोंदवला ऑनलाईन सहभाग

नगर - महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र प्राप्त संस्था वधु वर सुचक मंडळ संस्था संचालक व संचालिका यांचे संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय वधु वर सुचक ऑनलाईन मेळावा मोठ्या प्रमाणात वधु वर यांची ऑनलाईन सहभाग नोंदविला जाऊन मेळावा झाला. १६/६/२०२४ रोजी दुपारी एक वाजता या मेळाव्याला सुरुवात करण्यात आली सध्या बरेच ठिकाणी मोठ्या प्रमाणात भेडसावत असलेली समस्या मुला मुलींचे विवाह संदर्भात पालक चिंताग्रस्त झाले आहेत. त्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र प्राप्त वधु वर सुचक मंडळ संस्था संचालक व संचालिका यांचे संयुक्त विद्यमाने वधु वर परिचय मेळावा ऑनलाईन आयोजित करण्यात आला होता.

या वधु वर मेळावा सहभाग साठी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या समाजातील व्यक्ती यांचे मार्गदर्शन व सहकार्य मुळे मेळावा सहभाग साठी मुला मुलींची उपस्थिती साठी मार्गदर्शन लाभले या मेळाव्यात सहभागी होणे साठी ८०/मुली व १६०/मुलांनी या मेळाव्यात सहभागी नोंदविला व आपले परिचय करून दिले प्रत्येक मुला मुलींचे पालक यांची इच्छा असते योग्य जोडीदार स्थळ आमच्या मुला मुलींना मिळावेत त्या दृष्टीने या आगळ्यावेगळ्या ऑनलाईन वधु वर परिचय मेळावा संदर्भात सर्वांना उत्सुकता होती ती उत्सुकता मुला मुलींनी मेळाव्यात सहभागी होऊन आपलेला योग्य जोडीदार व सहचारिणी मिळावी म्हणुन मुला मुलींना आयोजन कमेटी मार्फत विचारले गेलेली प्रश्न व शंका समाधान मार्गदर्शन मार्फत मुला मुलींनी योग्य जोडीदार स्थळ मिळावेत अशी अपेक्षा व्यक्त केली व यथा योग्य जोडीदार स्थळास मुले व मुली यांनी प्रतिसाद दिला हा मेळावा संपन्न करणे साठी मेळाव्यात सहभागी संचालक

१) मध्यस्थ वधु वर संशोधन केंद्र अहमदनगर च्या संचालिका डॉ. सौ.विद्याताई होळेहोन्नुर, सौ.नेहाताई प्रभुणे, सौ. सुजाताताई संगमनेरकर नगर २) प्रेमबध च्या पनवेल नवीमुंबई सौ. राणीताई देशपांडे पनवेल नवी मुंबई ३) नाते मनाचे श्रीमती मोनिकाताई चौधरी छत्रपती संभाजीनगर ४) सौ. मंगल केसकर साथ संगत वधू वर सूचक मंडळ पुणे ५) वैष्णवी वधुवर श्रीमती अलका कुलकर्णी नगर ६) बहुभाषिकच्या सौ.प्रियाताई जाणवे नगर ७) सौ.प्राजक्ता कुलकर्णी मुंबई ८) नमस्वी भावबंध वधुवर सुचक मंडळ सचिन सुधाकर कुलकर्णी कोपरगाव यांचे सहकार्य लाभले व या मेळाव्याला उत्तम प्रतिसाद मिळाला

# व्यवस्थापन संस्था आणि उद्योग क्षेत्राने सोबत काम केल्यास योग्य मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी अधिक सोपे होईल

### राजेश पेवाल यांचे प्रतिपादन



आय एम एस संस्थेत एच आर मीट चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे यांच्यासह सहभागी झालेले विद्यार्थी आदी.

## आय एम एस संस्थेत एच आर मीट चे यशस्वी आयोजन

नगर - व्यवस्थापन संस्था आणि उद्योग क्षेत्राने सोबत काम केल्यास योग्य मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी अधिक सोपे होईल असे प्रतिपादन एमसीसीआयएच्या एच आर व आय आर फोरमचे अध्यक्ष राजेश पेवाल यांनी केले.

आय एम एस संस्थेच्या वतीने आयोजित एच आर मीट २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, शिक्षक, विद्यार्थी व नगर शहरातील नामांकित कपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. पेवाल पुढे म्हणाले की यापुढील काळात एच आर चे काम अधिक जबाबदारीचे होणार आहे कारण नवीन तंत्रज्ञान येत आहे. ए आय चां वापर देखील वाढणार आहे त्यामुळे योग्य व्यक्ती निवडण्यासाठी त्याची मदत होईल परंतु त्यामुळे योग्य स्किल असणार व्यक्तीची निवड केली जाईल. विद्यार्थ्यांनी मुलाखतीला जात असताना आपल्याला खरेच स्किल आहे का याचा विचार करावा. विद्यार्थ्यांमध्ये योग्य स्किल निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रमांत काही बदल करता आले तर ते देखील व्हावेत असेही त्यांनी सुचवले. डॉ. मेहता यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची व संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

डॉ. ऋचा तांदूळवाडकर यांनी महिलांसाठी राबविले जाणारे उपक्रम, नृत्य क्लासेस याविषयी माहिती दिली. कंपन्यांच्या वतीने मिलिंद कुलकर्णी, संतोष माणकेश्वर, आनंद पालेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. विजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले व नगर मध्ये बेस्ट एच आर, बेस्ट कंपनी व उद्योग क्षेत्रातील व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार दिले जावेत यासाठी आय एम एस संस्था प्रयत्न करेल असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी मुळे, श्वेता घाटकांबळे यांनी केले तर आभार डॉ. प्रोनोती तेलोरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी एमबीएच्या श्रद्धा फाटक, ऋतुजा गोरे, समृध्दी शहाणे, श्रद्धा बोरा, धनंजय हांडे, दिनेश गव्हाणे, अमित बरवेकार, नम्रता निंबाळकर या विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले.

# जोश


# गोधडीला मॉडर्न लूक देणारे ऋषिकेश

**पूर्वी आपली आजी जुन्या साड्यांपासून मऊसूत गोधड्या शिवायची. त्या गोधड्यांना आजीच्या मायेची उब असायची. पुढे कितीतरी वर्ष या गोधड्या जशाच्या तशा असायच्या. हे पारंपारिक पांघरूण शिवण्यामध्ये विशेषत: महिलांचा हात असायचा. पण आता पुरूषही या कामांमध्ये मागे नाहीत, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.**

अचिव्हर

पुण्याच्या हृषिकेश साने यांनी गोधडी शिवण्याच्या व्यवसायात पदार्पण केलं. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते टूरिझम क्षेत्रात काम करु लागले. या व्यवसायातंर्गत विविध ठिकाणी जंगल सफारींचे आयोजन करणे, बरोबरीने पासपोर्ट, व्हिसाची कामे करणे अशाप्रकारे त्यांची कारकीर्द सुरू होती. त्यांच्या पत्नी सायली यांचे फॅशन डिझाइनिंग क्षेत्रात शिक्षण झाले होते. त्यामुळे त्यांनी घरातूनच ड्रेस विक्रीचा व्यवसाय सुरु केला. लग्न होऊन दोघांनी मिळून ड्रेस विक्रीचा व्यवसाय वाढवायचा, असे ठरवले. सुरूवातीला ड्रेस मटेरियल, कुर्ती याची विक्री ते करत असत. खास करुन लहान मुलींच्या फ्रॉक्सची विक्री त्यांनी सुरू केली.


हे फ्रॉक्स शिवण्यासाठी लागणारे विविध कापडांचे तागे २०२० च्या मार्च महिन्यात दुकानात येऊन पडले होते. तेवढ्यात कोरोनामुळे लॉकडाऊन सुरू झाले. या काळात लहान मुली दुकानात येऊन माप देऊन, आवडत्या फॅशनचा फ्रॉक शिवून घेतील अशी शक्यता कमी होती. त्यामुळे पडून राहिलेले कापड जुने होऊन खराब होईल. पण या सगळ्या ताग्यांचे करायचे तरी काय, असा विचार त्यांना भेडसावत होता.आजीच्या जुन्या साड्या वापरुन मऊसूत, उबदार गोधडी शिवली जायची तशी आपण यापासून बनवली तर, असा विचार त्यांच्या मनात आला आणि तो लगेचच कृतीत देखील उतरवला. त्या कापडाचे योग्य त्या मापाचे तुकडे एकत्र करुन छान डिझाईन करुन एक गोधडी शिवली.



गोधडीचे फोटो काढून फेसबुक वर पोस्ट केले. आश्चर्य म्हणजे दोन-तीन दिवसांमध्येच ग्राहकांकडून ३० गोधड्यांची मागणी आली. हे पाहून त्यांना हुरूप आला आणि हाच व्यवसाय आता यापुढे सुरु ठेवायचा असे ठरवून त्यांनी 'अटायर बुटिक'ची स्थापना केली. सुरूवातीला एक गोधडी तयार व्हायला साधारण सात ते आठ दिवसांचा कालावधी लागत असे. त्यामुळे ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी बराच वेळ लागत असे. पण आता विविध प्रयोग करून त्याचं तंत्र समजल्यामुळे आणि सराव झाल्यामुळे एका दिवसात त्यांच्या १०-१२ गोधड्या सहज शिवून होतात. परिणामी, ३ ते ४ दिवसात ग्राहकांपर्यंत माल पोहोचवला जातो.

गोधडी शिवण्याची सुरूवात कापडाच्या सिलेक्शनपासून होते. कापडाचे तागे आले की हृषिकेश आणि त्यांच्या पत्नी गोधडीचं डिझाईन तयार करतात. रंगसंगती ठरवून कापडाचे तुकडे डिझाईन प्रमाणे लावले जातात. गठ्ठे तयार करून मशिनवर शिवले जातात. पुढे बॉर्डर लावून झाली की गोधडी तयार होते. यातले कापड कापायचे काम इलेक्ट्रिक कटरने, तर काही काम शिवणकामाच्या व्यावसायिक मशिनवर केले जाते. यासाठी आज त्यांच्याकडे सहा मशिन्स, एक ओव्हरलॉक मशिन आहे. या व्यवसायातून महिलांना रोजगार मिळावा यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. 'अटायर बुटिक'मध्ये कायमस्वरुपी दोन महिला, दोन टेलर काम करतात. महाराष्ट्रासह जर्मनी, ऑस्ट्रेलिया अमेरिका, युरोप इथे अटायर बुटिकच्या गोधड्या पोहोचल्या आहेत.

गोधडीच्या दर्जामधे कोणतीही तडजोड न करता योग्य त्या किंमतीत ग्राहकांना गोधडी कशी देता येईल यांवर हृषिकेश यांचा अभ्यास चालू आहे. शिवणकामांच्या मशिन्सची संख्या वाढवणे, अधिक गरजू महिलांना रोजगार मिळवून देणे, मोठ्या प्रमाणात मागणी घ्यायची झाली तर ती पूर्ण करण्यासाठी काय करता येईल याचा देखील अभ्यास सध्या ते करत आहेत.



# व्यायामाचा कंटाळा नको

फिटनेस फंडा

उद्यापासून व्यायाम सुरू करू असं म्हणणाऱ्यांचा उद्या कधीच येत नाही. तुम्हीही व्यायाम उद्यावर ढकलताय का? सकाळी उठून जीममध्ये जाणं तुमच्यासाठी खूप मोठं आव्हान आहे का?सकाळी मस्त ताणून द्यायची, आराम करायचा असं तुम्हाला वाटत असेल तर लवकर जागे व्हा. सकाळी उठून व्यायामाला सुरूवात करा. ही सवय लावून घेण्यासाठी काय करायचं याविषयी...

✽ सोशल मीडियावर काही वेळ घालवल्याशिवाय झोप येत नसेल तर तुम्हाला ही सवय बदलायला हवी. सोशल मीडियामुळे तुमचं वजन कमी होणार नाही. मात्र जीममध्ये घाम गाळल्यामुळे तुम्ही नक्कीच फिट व्हाल. सकाळी लवकर उठण्यासाठी रात्री लवकर झोपायला हवं. आठ तासांची शांत झोप घेतल्यानंतर सकाळी ताजंतवानं वाटतं. त्यामुळे दररोज लवकर उठण्याची सवय लावा.

✽ जीमला जाताना एखाद्या मित्र किंवा मैत्रिणीला सोबत घ्या. कोणीतरी सोबत असेल तर तुम्हालाही जीमला जाण्यात रस वाटेल. मस्त गप्पा मारत जीममध्ये जाण्याचा आनंद वेगळाच असतो.

✽ जवळची जीम शोधा. लांबवरच्या जीममध्ये जायचा खूप कंटाळा येतो. अशावेळी जवळच्या जीमचं सदस्यत्त्व घेतलं तर तुमचा वेळही वाचू शकेल.

✽ आपल्याला वजन कमी करायचं आहे असा दृढनिश्चय करा. एखाद्या दिवशी आपल्याला खूप कंटाळा येईल. पण हा कंटाळा बाजूलाा ठेऊन व्यायाम करायला जा. कंटाळ्यापेक्षाही व्यायाम जास्त महत्त्वाचा आहे.


✽ तुमचं वजन एका दिवसात वाढलेलं नाही. तसंच ते पटकन कमीही होणार नाही. त्यामुळे या प्रक्रियेसाठी थोडा वेळ द्या. झटपट निकालांची अपेक्षा करू नका.

# मॉन्सूनमध्ये ओरछा

भटकंती

मॉन्सूनचा आनंद लुटायचा असेल तर तुम्ही मध्य प्रदेशातल्या ओरछाला जाऊ शकता. ओरछा हे हॉट मॉन्सून डेस्टिनेशन आहे. वर्षभर कोरडा असणारा माळवा प्रांतातला हा भाग पावसाळ्यात नव्या नवरीप्रमाणे नटतो. नजर जाईल तिथे हिरवळ पहायला मिळते. पावसामुळे इथली बेटवा नदी दुथडी भरून वाहू लागते आणि तिच्या किनारी वसलेली गावं मोहरून जातात. इथले पर्वत हिरवाईने नटतात. इथे तुम्ही काही काळ निवांत घालवू शकता.

फक्त हिरवळ आणि धबधबेच नाही तर इतर बरंच काही इथे पाहता येतं. ऐतिसासिक किल्ले, ठिकाणं, मंदिरं, पर्यटन स्थळं असं बरंच काही आपल्याला आकर्षित करतं. जुना काळ जागवणाऱ्या विविध वास्तूही लक्ष वेधून घेतात. पावसाळ्यात या भागाचं सौंदर्य खूपच खुलतं. तुम्हीही पावसाच्या प्रेमात पडला असाल तर ओरछाला नक्की भेट द्या.



मध्य प्रदेशातल्या कोणत्याही शहरातून ओरछाला जाता येतं. ग्वाल्हेरच्या विमानतळापासून हे ठिकाण जवळ आहे. ओरछापासून १२३ किलोमीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणापासून तुम्ही अगदी सहज ओरछाला पोहचू शकता. झांशी रेल्वेस्थानकावर उतरून ओरछाला जाता येईल. मान्सूनमधला आनंद लुटण्यासाठी स्वत:च्या वाहनानेही हा प्रवास करता येईल. ओरछा हा हटके अनुभव ठरेल.

# स्पष्टपणे बोल

मॅच मेकिंग



मी २८ वर्षांची तरुणी असून माझं एका मुलावर प्रेम आहे. पण पालकांना तो आवडत नसल्यामुळे त्यांनी माझं लग्न दुसऱ्या मुलाशी ठरवलं आहे. याबाबत मी माझ्या प्रियकराला सांगितलं. हे नातं तोडायचं ठरवलं. पण मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही, असं त्याचं म्हणणं आहे. या सगळ्या परिस्थितीसाठी तो मला जबाबदार धरतो आहे. या सगळ्याचा मला खूप ताण आला आहे. मी आईवडिलांच्या विरोधात जाऊ शकत नाही. प्रियकरालाही सोडू शकत नाही. मी काय करू?

– तुझी सध्याची मनस्थिती खूप गुंतागुंतीची असणार यात शंका नाही. या नात्याबद्दल तू आईशी बोललीस. तिच्याकडून तुला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अशा परिस्थितीत तू कुटुंबातल्या इतर सदस्यांचा आधार घेऊ शकतेस. भावंडं, काका, मामा, आजोबा, आजी यांच्यापैकी कोणाशी तरी बोल. तुझ्या वडिलांशी स्पष्टपणे बोलू शकणाऱ्या व्यक्तीला हा गुंता सांग. तुझा प्रियकर किंवा त्याच्या कुटुंबियांना यासाठी पुढाकार घ्यायला सांग. या नात्याबद्दल तुझे पालक साशंक असतील. ते तुला काही प्रश्न विचारतील. या प्रश्नांची शांतपणे उत्तरं दे. त्यांच्या सगळ्या शंका दूर कर. याआधी तुझ्या प्रियकराला विश्वासात घे, त्याच्याशी स्पष्टपणे बोल. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घे.

# पायाला वास येतो?

ग्रुमिंग

कधी कधी विशेषत: पावसाळ्यामध्ये ऑफिसमधल्या शूज आणि चपलांचा वास येतो आणि त्यामुळे ऑफिसमध्ये वावरताना अवघडल्यासारखे वाटू शकते. यासोबतच काही वेळा सॉक्सलाही दुर्गंधी येते. एखाद्या व्यक्तीला जास्त घाम येत असला तरी पायाला दुर्गंधी येण्याची समस्या होऊ शकते. अशा परिस्थितीत काही सोप्या उपायांच्या मदतीने तुम्ही या समस्येपासून बऱ्याच अंशी सुटका मिळवू शकता.



✽ मिठाचं पाणी: घरी आल्यावर पाय दररोज थोडावेळ मिठाच्या पाण्यात पाय भिजवून बसा. मिठाच्या पाण्याने पाय धुतले तर पायाला येणारा वास बऱ्याच अंशी दूर होतो. यासाठी तुम्ही अर्धा लिटर पाण्यात अर्धा कप मीठ टाकून त्यात पाय टाकून बसावे. १५ ते २० मिनिटांनी पाय चांगले पुसून कोरडे करावेत.

✽ व्हिनेगर: जुन्या बादलीत थोडे कोमट पाणी घेऊन त्यात एक कप व्हिनेगर टाका. नंतर थोडा वेळ पाय बुडवून ठेवा. १० ते १५ मिनिटांनी पाय पुसून टाका. हा उपाय करून तुम्ही तुमच्या पायाला येणारा दुर्गंध दूर करू शकता.

✽ बेकिंग सोडा: या उपायासाठी तुम्हाला फक्त पाण्यात थोडासा बेकिंग सोडा टाकावा लागेल. त्यानंतर त्यात काही वेळ पाय बुडवून बसावे लागेल. यामुळे दुर्गंधी पसरवणारे बॅक्टेरिया तर मरतीलच, पण पायाला संसर्गही होणार नाही.

✽ शूज आणि मोजे स्वच्छ ठेवा: तुम्ही चामड्याचे शूज किंवा सँडल घालत असाल तर ते सूर्यप्रकाशात ठेवा. शक्य असल्यास धुवून चांगल्या प्रकारे सुकवून घ्या. दुसरीकडे, दररोज चांगल्या डिटर्जंटने आपले मोजे स्वच्छ करा. यामुळे पायांना वास येण्याचं प्रमाण कमी होईल.

# वेगाने वाढणारे 'स्पा' क्षेत्र

करिअर

आजच्या अत्यंत धकाधकीच्या आयुष्यात अनेकांना सतत स्पर्धात्मक वातावरणात काम करत आपल्या क्षमता सिद्ध कराव्या लागतात. ते करताना येणाऱ्या मानसिक आणि शारीरिक दोन्ही ताणतणावांना तोंड द्यावे लागते. या धकाधकीच्या दिनक्रमापासून दिलासा मिळण्यासाठी आणि स्वत:मधील उत्साह, ऊर्जा कायम राखण्यासाठी अनेक व्यक्ती आपापल्या पद्धतीने प्रयत्नशील असतात. यामध्ये स्पा थेरपीचा उपयोग करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. शारीरिक ताणतणाव आणि वेदना यांपासून काही क्षण मुक्तता मिळावी, तन-मन प्रफुल्लित व्हावे, शांततेची अनुभूती मिळावी, असे प्रत्येकाला वाटत असते. हा मार्ग अनेक व्यक्तींना स्पाच्या माध्यमातून उपलब्ध होतो. त्यामुळे हळूहळू हा व्यवसाय उद्योगाचे रूप धारण करू लागला आहे. स्पा केंद्र, अत्याधुनिक सलून्स, मसाज केंद्र, फिटनेस केंद्रे अशा काही घटकांची साखळी या उद्योगाच्या परिघात येते. अधिकाधिक लोक स्पा किंवा मसाज केंद्रामध्ये जाऊन त्यावर वारेमाप खर्च करत असल्याने या क्षेत्राची वाढ २० ते २५ टक्के आहे. त्यामुळेच या क्षेत्रात प्रशिक्षित तज्ज्ञांची गरजही तितक्याच प्रमाणात वाढते आहे.



स्पा व्यवसाय अथवा उद्योगात करिअरच्या संधी उपलब्ध होत असल्या तरी त्यासाठी कौशल्यप्राप्त करणे आवश्यक ठरते. त्यासाठी उत्तम संस्थांमधून प्रशिक्षण घेणे गरजेचे ठरते. त्यात विविध बाबींचा समावेश होतो. डिप्लोमा इन होलिस्टिक स्पा थेरपी, आयुर्वेद स्पा थेरपी, स्पा मॅनेजमेंट, सर्टिफिकेट इन आयुर्वेद स्पा थेरपी यासारखे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यामध्ये विविध प्रकारचे तंत्रकौशल्य, सिद्धान्त, उपचारपद्धती आदी बाबींचे प्रशिक्षण दिले जाते. हे अभ्यासक्रम कोणत्याही वयोगटातील उमेदवारांना करता येतात. कोणत्याही विद्याशाखेतील बारावी उत्तीर्ण उमेदवारांना हे अभ्यासक्रम करता येतात. औपचारिक प्रशिक्षण आणि अनुभवानंतर स्पा थेरपिस्ट, कन्सल्टंट, फिटनेस ट्रेनर अशा करिअरच्या संधी मिळू शकतात. गुणवत्ता आणि सेवेचा दर्जा जितका उच्च प्रतीचा असेल तितके उत्पन्नही वाढू शकते. व्यक्तिगत थेरपिस्ट म्हणून सेवा देता येते. मोठ्या स्पा केंद्रामध्ये व्यवस्थापक म्हणून प्रगती करता येते. स्वत:चे स्पा केंद्रही उघडता येऊ शकते. या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्थांबद्दल जाणून घेऊ या.

✽ इंटरनॅशनल स्कूल ऑफ ॲस्थेटिक्स ॲण्ड स्पा

✽ क्रिस्टाइन वाल्मी इंटरनॅशनल अकॅडमी

✽ स्नेल हंस इंटरनॅशनल स्कूल ऑफ ब्युटी, हेअर ड्रेसिंग अँड कॉस्मेटोलॉजी

✽ इंडो-कॅनेडियन नॅशनल अकॅडमी

✽ नलिनी अँड यास्मिन एज्युकेशन

## शेर की जुबानी

ये रात भी तन्हाई बर्दाश्त नहीं
करती, वक्त बीताने के लिए
मेरी नींद उडाती है।

कुछ रिश्तों को कभी भी नाम न देना
तुम, इन्हें चलते दो
ऐसेही इल्जाम ना देना तुम।

हमें कहां मालूम था
कि इश्क होता क्या है,
बस एक तुम मिले और जिंदगी मुहब्बत बन गई।

## बी अलर्ट

### सायबर हल्ला टाळायचा तर...




सध्याच्या काळात देशभरात सायबर हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचं आकडेवारी सांगते. सायबर हल्ले कोणत्याही माध्यमातून होऊ शकतात. अनेकांची केवायसी अपडेटच्या नावाखाली फसवणूक होते. मेसेज, मेल किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून सायबर हल्ला होतो आणि तुमच्या मोबाईलमधली सगळी माहिती चोरांपर्यंत पोहोचते. म्हणूनच सायबर हल्ला झाल्याचं लक्षात आल्यानंतर फोन लगेच शटडाउन करा. अनोळखी ॲप, मेसेज किंवा लिंक ओपन करू नका. क्रेडिट किंवा डेबिट कार्ड, ओटीपी तसंच सीव्हीसी क्रमांक शेअर करू नका. आपल्या बँक खात्याची माहिती कोणालाही देऊ नका.

## ऑटो टेक

### टाटाच्या कारवर मिळतोय बंपर डिस्काऊंट

टाटा मोटर्सने सप्टेंबर २०१७ मध्ये पहिल्यांदा आपली प्रसिद्ध एसयुव्ही टाटा नेक्सॉन घरगुती बाजारपेठेत लाँच केली होती. गेल्या काही वर्षांमध्ये ही एसयुव्ही प्रचंड लोकप्रिय झाली. या गाडीची सात लाखांपेक्षा अधिक युनिट्सची विक्री झाल्याचा कंपनीचा दावा आहे. त्यामुळे कंपनीने टाटा नेक्सॉनवर बंपर डिस्काऊंट जाहीर केला आहे. याअंतर्गत ग्राहक एक लाखाची बचत करु शकतात. दरम्यान पेट्रोल इंजिनसह येणाऱ्या स्मार्ट, स्मार्ट प्लस आणि स्मार्ट एस व्हेरियंट वर अनुक्रमे १६ हजार, २० हजार आणि ४० हजारांची सूट दिली जात आहे.



## व्हॉट्स न्यू?

### तरुणाईकडून डम्ब फोनची मागणी!




सध्या जगभरामध्ये एक अगदी आगळावेगळा आणि विचित्र ट्रेण्ड पाहायला मिळत आहे. या ट्रेण्डमध्ये अनेक तरुण मुलं स्मार्टफोनऐवजी डम्ब फोनला प्राधान्य देताना दिसत आहेत. स्मार्टफोनच्या अगदी विरुद्ध असणाऱ्या बेसिक फोनची विक्री पुन्हा वाढू लागली आहे. या बेसिक फोन्सला आता स्मार्टफोनच्या जगात 'डम्ब फोन्स' म्हणजेच संथपणे काम करणारे किंवा मार्यादित पर्याय देणारे फोन म्हणून ओळखलं जातं. या डम्ब फोनवरुन केवळ फोन कॉल आणि टेक्सट मेसेज करता येतात. जनरेशन झेडला भविष्यात कदाचित आपल्या फोन्सकडून एवढ्याच गोष्टी अपेक्षित असतील तर हे डम्ब फोन त्यांची पहिली पसंती असेल.

## गॅझेट वर्ल्ड

### गॅझेट्स चार्जिंगची चिंता संपली

आपल्याला खूप लांब प्रवास करायचा असेल तर त्या दरम्यान फोनचे चार्जिंग लवकर संपते. प्रत्येक देशात वेगवेगळ्या प्रकारचे प्लग असतात. तुम्ही दुसऱ्या देशात प्रवास करणार असाल तर एक युनिव्हर्सल ट्रॅव्हल एडाप्टर खरेदी करणं गरजेचं असतं. काही ॲडाप्टर युएसबी पोर्टदेखील देतात. त्यामुळे कोणतेही डिव्हाईस चार्ज होऊ शकते. वायरलेस चार्जर अनेक डिव्हायसेसला सपोर्ट करतं. पोर्टेबल वायरलेस चार्जिंग पॅड घेऊन तुम्ही कुठेही आरामात जाऊ शकतात. एक मजबुत मल्टी-टिप असलेली केबल घ्या. त्यात USB-C, लायटनिंग आणि माइक्रो-USB कनेक्टर असेल. त्यानं तुम्ही कोणतंही डिव्हाइस चार्ज करु शकतात.



# गरमागरम अंडा-पकोडा

झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम भजी खायची लहर येते. अशावेळी हॉस्टेलमध्येच तुम्ही भजीचा घाट घालू शकता. बटाटा, कांदा, पालक या भजी आपण नेहमीच खातो. त्यामुळे यंदा अंडा-पकोडा ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य** : चार उकडलेली अंडी, चार मोठे चमचे बेसन, चिमूटभर मिरपूड, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा ओवा, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ आणि तेल.



**कृती** : उकडलेल्या अंड्यांचे दोन भाग करा. अंड्यांना मीठ आणि मिरपूड लावून ठेवा. आता एका भांड्यात बेसन घ्या. त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, ओला आणि गरजेनुसार पाणी घालून भजीचं पीठ तयार करा. हे पीठ फार घट्ट आणि सैलही नको. त्यामुळे बेताने पाणी घाला. कढईत तेल गरम करून घ्या. अंड्याचे तुकडे बेसनच्या पिठात घोळवा. हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. ही भजी चटणी किंवा सॉससोबत खा.

# भाजपने पाळला २५ जून हा आणीबाणी काळा दिवस

## आणीबाणी हा भारतीय लोकशाहीच्या इतिसाहातील काळा दिवस : ॲड.अभय आगरकर



भाजपाच्यावतीने २५ जून हा आणीबाणी काळा दिवस भाजप कार्यालय येथे पाळण्यात आला.

नगर - आणीबाणी फक्त २१ महिने होती, पण स्वतंत्र भारताच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासात सदैव तिचा उल्लेख एक काळा कालखंड म्हणूनच होत राहिल. राज्यघटनेची मोडतोड, न्यायव्यवस्थेत हस्तक्षेप, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी, राज्य घटनेच्या मूळ ढाच्याशी छेडछाड, आणि कुटुंब नियोजनातील अत्याचार या गोष्टी भारतीय जनमानस कधीही विसरू शकत नाही. आणीबाणी हा भारतीय लोकशाहीच्या इतिसाहातील काळा दिवस होता. आणीबाणी उठविल्यानंतर जनसंघासह सर्वच काँग्रेसच्या विरोधातील राजकीय पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. अनेक नेते तुरुंगामध्येच होते, त्यांनी तुरुंगामधूनच लोकसभेची निवडणूक लढवली, एकही दिवस प्रचाराला न जाता प्रचंड मतांनी जनतेने त्यांना निवडून दिले. याचाच अर्थ भारतीय जनतेच्या मनात लोकशाही बद्दल किती अस्था आणि आपुलकी होती हे स्पष्ट होते. आणीबाणी काळात भारतीय जनसंघाचे वरिष्ठ नेत्यांनी मिसा या कायद्याखाली तुरुंगात टाकण्यात आले. यामध्ये नगरमधील जनसंघ व संघाचे अनेक कार्यकर्तेही सहभागी झाले होते, त्यांनीही या काळात तुरुंगवास भोगला. आजही त्या कटू आठवणी सर्वांच्या मनात कायम आहेत, असे प्रतिपादन भाजपाचे शहराध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी केले.

भाजपाच्यावतीने २५ जून हा आणीबाणी काळा दिवस भाजप कार्यालय येथे पाळण्यात आला. याप्रसंगी ॲड. अभय आगरकर, सुनिल रामदासी, प्रा.भानुदास बेरड, सचिन पारखी, प्रशांत मुथा, साहेबराव विधाते, रेखा मैड, सुनिल सकट, विशाल खैरे, विजय गायकवाड, साहिल शेख, निरज राठोड, श्वेता पंधाडे, गिता गिल्डा, मनोज ताठे, राजेंद्र फुलारे, भार्गव फुलारे, ज्ञानेश्वर धिरडे, पंडित वाघमारे, अमोल निस्ताने, बाबा सानप, नितीन शेलार, बंटी डापसे, बाळासाहेब गायकवाड, कैलास गर्जे, कालिंदी केसकर, प्रिया जानवे, अनिल निकम, सविता कोटा, बाळासाहेब भुजबळ, संजय ढोणे, गोकूळ काळे, चंद्रकांत दारुणकर, ज्योती दांडगे, सोमनाथ जाधव, अनिल सबलोक, करण कराळे, मिनीनाथ मैड, विलास नंदी, हेमंत कोहळे, राजू मंगलाराप, दिपक देहेरेकर, प्रविण ढोणे, सुजित खरमाळे आदि उपस्थित होते.

यावेळी आणीबाणी काळात आंदोलनात सहभागी असलेल्या नरेंद्र कुलकर्णी, मोहन नातू, दिलीप पोपट मुथा, बाळकृष्ण खांदाट, प्रकाश गटणे, रविंद्र बडवे, पद्माकर बंडू देशमुख आदिंचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी नरेंद्र कुलकर्णी यांनी आणीबाणीतील कटू आठवणी सांगतांना म्हणाले, भारतामध्ये पहिली तीन दशक एकाच पक्षाची सत्ता, म्हणजेच काँग्रेसची सत्ता होती. विरोधी पक्ष अत्यंत नगण्य अवस्थेमध्ये होते. या काळात काँग्रेसने एक घोषणा दिलेली होती, इंदिरा इज इंडिया, इंडिया इज इंदिरा, राज्यघटना, न्यायालय, पार्लमेंट यांच्यापेक्षाही इंदिरा मोठी असा या घोषणेचा अर्थ होता. भारतीय जनमानसाला याची जाणीव झाली की लोकशाहीमध्ये प्रबळ विरोधी पक्षाची सुद्धा गरज असते, आणि जर प्रबळ विरोधी पक्ष नसेल तर सत्ताधारी आणीबाणीच्या माध्यमातून लोकशाहीची हत्या करू शकतात हे आणीबाणीच्या घोषणातून सिद्ध झाले. त्याकाळात विरोधकांवर अनन्वित अत्याचार करण्यात आले. आजही भाजप त्याचा निषेध करुन त्या काळातील लढवय्यांचा आदर करत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी प्रा.भानुदास बेरड म्हणाले, १९७५ मध्ये देशावर आणीबाणी लादल्यामुळे काँग्रेसविषयी जनमत प्रतिकूल झाले आणि खऱ्या अर्थाने आणीबाणीच्या उठवल्यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काँग्रेसचा पराभव झाला. स्वतः इंदिरा गांधी सुद्धा पराभूत झाल्या आणि मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली खऱ्या अर्थाने बिगर काँग्रेसी जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले हा इतिहास आहे. त्यामुळे आणीबाणीत खऱ्या अर्थाने जनतेवर किती अन्याय झाले हे त्यानंतर झालेल्या निवडणुकीतून दिसून आले. सूत्रसंचालन सचिन पारखी यांनी केले तर आभार प्रशांत मुथा यांनी मानले.



चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेत विजेत्या साईदीप हिरोस संघाच्या खेळाडूंचा सत्कार करताना प्रा. माणिक विधाते. समवेत अजय कविटकर त्याचप्रमाणे विजयी संघातील खेळाडू.

# चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेत साईदीप हिरोस विजेता

नगर - गेल्या १५ दिवसापासून चालू असलेल्या एक दिवसीय ५० षटकाची चॅम्पियन ट्रॉफी अंतर्गत झालेल्या अंतिम सामन्यात साईदीप हिरोस संघाने आर. एल. क्रिकेट अकॅडेमी संघाचा ९९ धावांनी पराभव केला.

प्रथम फलंदाजी करताना साईदीप हिरो संघाने ५० षटकात आठ गड्यांच्या मोबदल्यात ३०८ धावा केल्या. यामध्ये सर्वाधिक धावा सर्वेश कुलकर्णी यांनी केल्या. त्याने नाबाद १५० धावा केल्या. त्याला आयान जावेद सय्यद याने मोलाची साथ दिली. त्याने ५१ धावा केल्या.

आर. एल संघातर्फे साइस साळवे, शालम उजागरे व साईस देवकर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. प्रत्युत्तर दाखल आर. एल. संघाने सर्व बाद २०७ धावा केल्या. तनिष उदावंत याने सर्वाधिक ६९ धावा केल्या.

याप्रसंगी अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव माणिक विधाते सर अध्यक्षस्थानी होते. जिल्हा क्रिकेट निवड समितीचे अजय कविटकर, संदीप घोडके, जावेद सय्यद, सागर बनसोडे, परेश रासकर, तेजस करमरकर, जोशी सर, राहुल बिज्ञा, अशोक शेराल, ऋषिकेश सुंबे, प्रशांत अंतेपोलू, वेदांत क्यादर, गवळी मामा, आरिफ शेख उपस्थित होते.

श्री. विधाते सरांनी खेळाचे तसेच अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. खेळामध्ये लागणारे जिद्द, सराव यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच अशा स्पर्धांमधून गुणवान खेळाडूंना चांगले व्यासपीठ तयार झाले. व यातून चांगले खेळाडू तयार व्हावेत अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

उत्कृष्ट फलंदाज - तन्मय गायकवाड, उत्कृष्ट गोलंदाज - गुरुप्रसाद पांडे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक - आदित्य सोलस्कर, मालिकावीर - वेद मुंगेल, फायनल सामानवीर - सर्वेश कुलकर्णी. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत अंतेपोलू व आभार ऋषिकेश सुंभे यांनी मानले.

# दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेचे मंगळसूत्र हिसका मारून लांबवले

## गुलमोहर रोडवरील घटना; अज्ञात दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल

नगर - दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील डायमंडचे ७ पेंडल असलेले सोन्याचे मंगळसूत्र मोटारसायकलवर आलेल्या दोघांनी हिसका मारून तोडून पळवून नेले आहे. सोमवारी (दि.२४) दुपारी १२.३० च्या सुमारास सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवर ही घटना घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत स्वप्नाली राहुल वाळके (वय ३२, रा. ओम साई कॉम्प्लेक्स, काकासाहेब म्हस्के कॉलेज रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी वाळके या त्यांच्या लहान मुलाला शाळेतून घेवून दुपारी १२.३० च्या सुमारास गुलमोहर रोड कडून प्रोफेसर कॉलनी चौकाकडे त्याच्या मोपेड वर चाललेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या पाठीमागून काळ्या रंगाच्या मोटारसायकल वर २ अनोळखी इसम आले. त्यांनी मोटारसायकल फिर्यादी वाळके यांच्या जवळ आणली आणि मोटारसायकलवर पाठीमागे बसलेल्या इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून तोडले. काही क्षणातच दोघेही भरधाव वेगात तेथून पसार झाले. फिर्यादी वाळके यांनी आरडाओरडा केला. मात्र परिसरातील नागरिक जमा होई पर्यंत चोरटे तेथून पसार झाले होते. त्यानंतर वाळके यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात भा.दं.वि.कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मर्चंटस् बँकेच्या गुलमोहोर रोड शाखेतील कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

## लॉकर रूममध्ये पडलेली सोन्याची चीजवस्तू खातेदाराला परत



अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या गुलमोहोर रोड शाखेतील कर्मचारी अमित पाटील यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचा सत्कार करताना शाखाधिकारी बी. आर. ठोके, संतोष ठाकूर. समवेत सभासद मोहनलाल भंडारी (दादा कर्जतकर) व प्रकाश डुंगरवाल.

नगर - अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या गुलमोहोर रोड शाखेत लॉकर असलेल्या खातेदाराच्या सोन्याची चीजवस्तू बँक कर्मचाऱ्याच्या प्रामाणिकपणामुळे परत मिळाली आहे. या शाखेत प्रकाश डुंगरवाल यांचे लॉकर आहे. ते लॉकर उघडायला आले असताना त्यांची सोन्याची एक चीजवस्तू खाली लॉकर रूममध्ये पडली. ते निघून गेल्यावर लॉकर रूम अटेंडंट अमित पाटील यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी शाखाधिकारी बी. आर. ठोके व संतोष ठाकूर यांना कल्पना दिली. त्यानंतर शाखाधिकाऱ्यांनी श्री. डुंगरवाल यांच्याशी संपर्क साधून सदर चीजवस्तू त्यांच्याकडे सुपुर्द केली. यावेळी बँकेचे सभासद मोहनलाल गांधी (दादा कर्जतकर) आदी उपस्थित होते.

प्रकाश डुंगरवाल यांनी बँक कर्मचाऱ्याच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करून आभार मानले. चेअरमन हस्तीमल मुनोत यांनीही श्री. पाटील यांचे कौतुक केले. नुकतीच शिरुर शाखेतही बँकेच्या कॅशियरने एका खातेदाराचे अतिरिक्त भरणा झालेले ५५ हजार रुपये परत केले होते. मर्चंटस् बँकेच्या सर्वच शाखा अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेसाठी व प्रामाणिक सेवेसाठी नावाजल्या जातात. याचा अनुभव अनेकदा ग्राहकांना येत असतो. अशा कर्मचाऱ्यांमुळे बँकेची विश्वसनीयता आणखी वाढण्यास मदत होते.

अमित पाटील यांचे बँकेचे व्हा.चेअरमन अमित मुथा व सर्व संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे.

# देशाच्या व आयुर्वेदाच्या हितासाठी माणसे उभे करण्याचे उमेश तागडे यांचे काम सेवानिवृत्तीनंतरही चालू राहो

## वैद्य प्रभाकर पवार यांचे प्रतिपादन; अ.भा. आयुर्वेद संस्थान, नवी दिल्लीचे सहसंचालक वैद्य उमेश तागडे यांचा नगरमध्ये सेवापूर्ती गौरव सोहळा



अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान नवी दिल्लीचे सहसंचालक वैद्य उमेश तागडे यांचा सेवापूर्ती गौरव करताना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता वैद्य प्रभाकर पवार. समवेत आयुर्वेद व्यासपीठाचे केंद्रीय कार्यवाह वैद्य धनंजय कुलकर्णी, डॉ.दिलीप धनेश्वर, डॉ. विजयकुमार भंडारी, वैद्य ज्योती चोपडे आदी उपस्थित होते.

नगर - शासकीय सेवेची सुरवात सध्या वैद्यकीय अधिकरी म्हणून रुग्णसेवेने करत उमेश तागडे यांची सेवानिवृत्ती सेवा क्षेत्रातील व्यवस्थापनाच्या उच्च पदावरून झाली. धगधगत्या जम्मू काश्मीरमध्ये विस्थापितांच्या छावणीत वैद्यकीय सेवा देण्याचे कर्म त्यांनी केले. या प्रवासात आयुर्वेद व्यवस्थापनाचे असंख्य माणसे उभे करण्याचे महत्वाचे काम उमेश तागडे यांनी केल्याने नगरकरांच्या मनात त्यांच्याप्रती आदराची व सन्मानाची भावना आहे. हा फरक अन्य वैद्यकीय अधिकारी व उमेश तागडे यांच्यात आहे. अशा निस्वार्थ सेवा भावनेनं काम करण्याची बीजे लहानपणापासून आईवडिलांच्या संस्कारातून, चांगल्या मित्रपरिवाराचे सहकार्य व संघ संगाशी एकरूप होण्याने होते. यातूनच इतरांना उभे करण्याचे सामर्थ्य निर्माण होते. देशाच्या व आयुर्वेदाच्या हितासाठी माणसे उभे करण्याचे उमेश तागडे यांचे हे सेवा काम सेवानिवृत्तीनंतरही असेच चालू रहावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता वैद्य प्रभाकर पवार यांनी केले.

नगरचे वैद्य उमेश तागडे हे नुकतेच अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान नवी दिल्लीच्या सहसंचालक पदावरून सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने नगरमधील वैद्यकीय व सेवा क्षेत्रातील विविध संघटनांच्या वतीने वैद्य तागडे यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता वैद्य प्रभाकर पवार यांच्या हस्ते मानपत्र, पुणेरी पगडी, ज्ञानेश्वरी ग्रंथ देवून वैद्य उमेश तागडे यांचा गैरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे आयुर्वेद व्यासपीठाचे केंद्रीय कार्यवाह वैद्य धनंजय कुलकर्णी, जनकल्याण रक्तपेढीचे मार्गदर्शक डॉ.दिलीप धनेश्वर, आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे सेक्रेटरी डॉ. विजयकुमार भंडारी, आयुर्वेद व्यासपीठ जिल्हा अध्यक्ष वैद्य ज्योती चोपडे आदींसह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आयुर्वेद व्यासपीठ, जनजाति कल्याण आश्रम, आरोग्य भारती, अ. भा. वि. प., निमा संघटना, महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन व जिल्हा रुग्णालय आयुष विभागाच्या वतीने गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

वैद्य धनंजय कुलकर्णी म्हणाले, स्व केंद्रित काम करणारे खूप आहेत. पं ध्येय केंद्रित काम करणारे कमी असतात. उमेश तागडे हे त्यातील एक स्वयंसेवक आहेत.सेवानिवृत्तीनंतर न थांबता त्यांनी आयुर्वेदाची सेवा अशीच पुढे चालू ठेवावी.

डॉ.दिलीप धनेश्वर म्हणाले, नौकरीच्या माध्यमातून जनसामान्यांची सेवा करून त्यालाच आपला श्वास व ध्यास करून उच्च विचाराने काम उमेश तागडे यांनी केले. या सेवा कार्याचे संस्कार संघ कार्यातून येतात. असे सांगून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

सत्कारास उत्तर देतांना वैद्य उमेश तागडे म्हणाले, शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग ज्या ठिकाणी अत्यावश्यकता आहे त्याठिकाणी करावा असे ठरवून नाशिकच्या दुर्गम भागात रुग्णसेवेचे काम सुरु केले. ज्यांना अजिबातच वैद्यकीय उपचार मिळत नाहीत अशा वनवासी भागांमध्ये पायी जाऊन त्यांच्यावर उपचार करून त्यांना जीवनदान देता आले. या सेवा कार्याने खूप समाधान मिळाले. या सेवा कार्याचे पूर्ण श्रेय हे संघातील संस्कारांना जाते. दिल्लीत अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान येथे हजर झाल्यावर आयुर्वेदाचे संशोधन करून तेथील ४० खाटांचे रुग्णालयाचे नूतनीकरण करून २०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय केले. केंद्र सरकारने सर्व राज्यांमध्ये दिल्लीच्या धर्तीवर अखिल भारतीय आयुर्वेद संस्थानची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सेवा निवृत्तीनंतरही तेथे सेवा करण्याची संधी मला मिळाली आहे. जीवनाच्या या वाटचालीत संघ परिवारातील संस्कार, कुटुंब व सहकरी मित्रांचे सहकार्य तसेच वैद्य प्रभाकर पवारांसारख्या अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शनामुळेच नगर ते थेट दिल्लीत काम करू शकलो देशभर अनेक सत्कार झाले पण नगरमध्ये झालेला सन्मान हा हृद्य सत्कार आहे.

प्रास्ताविकात प्रा.राजाभाऊ काळे यांनी वैद्य उमेश तागडे यांच्या अभाविपचा सामान्य कार्यकर्ता ते अ.भा. आयुर्वेद संस्थान, नवी दिल्लीचे सहसंचालक पदापर्यंतचा सेवा कार्याचा आढावा घेत गौरव सोहळ्याच्या मागची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैद्य रुपाली म्हसे यांनी केले. प्रशांत आढाव यांनी आभार मानले. पश्चीम महाराष्ट्र अध्यक्ष वै.मंदार भणगे यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी, कार्यवाह वैद्य अमेय कांबळे, कोषाध्यक्ष वैद्य विराज उत्पात, उपाध्यक्ष वैद्य महेश मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य वैद्य विलास जाधव, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष वै.मंदार भणगे, निमा संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. मुकुंद शेवगांवकर, महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनचे कोषाध्यक्ष वैद्य शरद टुबे, महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनचे संघटन मंत्री वैद्य महेंद्र शिंदे, आरोग्यभारतीचे वैद्य किशोर पूरकर, जनजाती कल्याण आश्रमाचे वैद्य नीळकंठ ठाकरे, प्रशांत आढाव, मृणाल तागडे, होमिओपॅथी कौन्सिलचे माजी अध्यक्ष डॉ. अजित फुंदे, भाजपाचे प्रा.भानुदास बेरड व सचिन पारखी आदी उपस्थित होते.

# मोटारसायकलस्वाराला भरदिवसा रस्त्यात अडवून लुटले; गुन्हा दाखल

नगर - मोटारसायकल वर चाललेल्या दोघांना भरदिवसा रस्त्यात अडवून तू माझ्या गाडीला कट का मारला अशी विचारणा करत दमबाजी करून त्याच्या खिशातून २० हजारांची रोकड बळजबरीने काढुन घेतल्याची घटना नगर पाथर्डी रोड वर बाराबाभळी गावाजवळील पुलावर सोमवारी (दि.२४) दुपारी १ च्या सुमारास घडली.

याबाबत भगवान उत्तम खाडे (वय ४६, रा. पेठ पांगरा, ता.आष्टी, जि.बीड) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा एक सहकारी असे दोघे त्यांच्या मोटारसायकल वर पाथर्डी कडून नगरकडे येत होते. बाराबाभळी गावाजवळ असलेल्या पुलावर त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका मोटारसायकलस्वाराने त्यांच्या मोटारसायकलला त्याची मोटारसायकल आडवी लावून त्यांना थांबवले. त्यानंतर तुम्ही मला कट का मारला म्हणत शिवीगाळ व दमबाजी सुरु केली. त्यानंतर फिर्यादी यांच्या खिशात हात घालत त्यांच्या खिशातून २० हजारांची रोकड काढुन घेतली व दमबाजी करत तेथून निघून गेला. ही घटना फिर्यादी खाडे यांनी भिंगार पोलिसांना सांगितली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध भा.दं. वि. कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# 'मुल्यसाखळी विकास योजने'चा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

## ३० जूनपर्यंत अर्ज करण्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांचे आवाहन



नगर - राज्य पुरस्कृत एकात्मिक कापुस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मुल्यसाखळी विकास योजना अंतर्गत बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपासाठी महाडीबीटी पोर्टल वर अर्ज करून मूल्य साखळी विकास योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले.


कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारीत पीक पद्धतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून कापुस, सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मुल्यसाखळीस चालना देणे या उद्देशाने राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस आणि सोयाबीन इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मुल्य साखळी विकासासाठी विशेष कृति योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. या निविष्ठांचा पुरवठा करण्याकरिता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर १२ जूनपासून सदर बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. बियाणे, औषधे व खते या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. शेतकरी बांधवांनी **mahadbt.maharashtra.gov.in** या वेबसाईट वर जाऊन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा. अर्ज करण्याचा कालावधी १२ ते ३० जून असून या कालावधीत शेतकऱ्यांनी अर्ज भरून योजनेचा लाभ घ्यावा असे श्री.बोराळे यांनी सांगितले.

सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालु खरीप हंगाममध्ये खालील निविष्ठा पुरविण्यात येणार आहे.

१. नैनो यूरिया सोयाबीन, २. नैनो डीएपी सोयाबीन, ३. नैनो युरिया कापूस, ४. नैनो डीएपी कापूस, ५. बैटरी ऑपरेटेड फवारणी पंप, ६. कापूस साठवणूक बॅग ७. मेटाल्डीहाइड सोयाबीन

# अहमदनगर जिल्ह्यात ३० सप्टेंबरपर्यंत शासनाचा वन महोत्सव

## रोपवाटिकांकधून वृक्षप्रेमींसाठी अल्प दरात रोपे उपलब्ध : वन विभागाची माहिती



नगर - निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांच्या दुतर्फा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व्हावी या हेतूने दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील १५ जून ते ३० सप्टेंबर यादरम्यान वन महोत्सव आयोजित करण्यात आला असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली. या महोत्सव कालावधीमध्ये वनविभागाच्या रोपवाटिकांमधून शासन निर्णयानुसार अल्प दरात विविध वृक्ष रोपे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व त्यांचे संगोपन आवश्यक आहे. त्यासाठी विविध शासकीय विभाग, शाळा - महाविद्यालय तसेच वृक्षप्रेमींनी पुढे यावे याकरिता शासन या महोत्सवाचे आयोजन करीत असते.

अहमदनगर जिल्ह्यात वनविभागाच्या एकूण १९ रोपवाटिका असून त्याद्वारे १४ लाख ६७ हजार ६५० इतकी रोपे यावर्षी तयार करण्यात आली आहेत यामध्ये तीन फूट उंचीची ६ लाख रोपे तयार आहेत. यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवड होण्याच्या दृष्टीने विविध शासकीय - निमशासकीय यंत्रणा, शाळा - महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, वृक्षप्रेमी संघटना यांनी सक्रिय सहभाग घेऊन पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा व वन महोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांनी केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

